मंगळवार, 08 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -89
RNI : MAH/2021/82566

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 08 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-89 ● RNI : MAH/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## चर्चेतली बातमी

# गुंडांनी जाळली पोलिसांची वाहने

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अमरावती मार्गावरील वसंतराव नाईक झोपडपट्टीतील पोलीस चौकीसमोर ठेवलेली पोलीस कर्मचाऱ्यांची वाहने गुन्हेगारांनी जाळली. वसंतराव नाईक झोपडपट्टी परिसरातील पोलिस चौकीजवळ ठेवलेल्या बीट मार्शलच्या दुचाकी अज्ञान व्यक्तीने जाळल्या. या झोपडपट्टीमध्ये कुख्यात भुरू गँगच्या गुंडांचा वावर असल्याने येथील नागरिक सातत्याने हैराण होते. त्यातून पोलिसांनी परिसरात पोलिस चौकी तयार केली. दररोज रात्री पोलिस या चौकीत उपस्थित असतात. याशिवाय परिसरात गस्त घालण्याच्या उद्देशाने गाड्या चौकीसमोर लावून शासकीय वाहनाने निघून जातात. मध्यरात्री बीट मार्शल दिगांबर मोटे, मोहन पराडकर आणि श्याम पांडे हे तिघेही गस्तीवर जात असल्याने त्यांनी आपल्या दुचाकी पोलिस चौकीच्या बाजूला पार्क करुन ठेवल्या. नंतर ते पेट्रोलिंगला गेले असता मध्यरात्री पावणे दोन वाजताच्या सुमारास अचानक तिघांच्या दुचाकी जळाल्याचे दिसले. यामध्ये एक ड्रिम युगा, एक स्पेंडल आणि एक सीडी 100 या दुचाकींचा समावेश आहे.

# १० टक्के आर्थिक आरक्षणावर शिक्कामोर्तब

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : आर्थिक दुर्बलांना (ईडब्ल्यूएस) नोकरी आणि प्रवेशांसाठी देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय आज (७ नोव्हेंबर) ऐतिहासिक निर्णय दिला आहे. १०३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून करण्यात आलेली आरक्षणाची तरतूद वैध असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. वेगवेगळ्या याचिकांच्या माध्यमातून आरक्षणासह घटनादुरुस्तीच्या वैधतेला आव्हान देण्यात आले होते. याच याचिकांवरील सुनावणीनंतर सरन्यायाधीश उदय लळित यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने हा निकाल दिला आहे.**

पाच सदस्यीय घटनापीठातील तीन न्यायमूर्तींनी आरक्षणाच्या बाजूने तर २ न्यामूर्तींनी आरक्षणामुळे संविधानाच्या मूलभूत संरचनेला धक्का पोहोचतोय, असा निकाल दिला आहे. मात्र ३:२ अशा बहुमतामुळे आर्थिक दुर्बल घटकांचे आरक्षण कायम ठेवण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. न्यायमूर्ती उदय लळित आणि रवींद्र भट यांनी आरक्षणाविरोधात निकाल दिला. सप्टेंबर महिन्यात या घटनापीठाने आर्थिक दुर्बलांना देण्यात आलेले आरक्षण आणि संविधानाचे उल्लंघन या दोन मुद्द्यांवरून दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकले होते. त्यानंतर न्यायालयाने २७ सप्टेंबर रोजी या प्रकरणासंबंधीचा निकाल राखून ठेवला होता. २०१९ साली 'जनहित अभियान'ने या प्रकरणात मुख्य याचिका दाखल केली होती. या याचिकेत १०३ व्या घटना दुरुस्तीच्या वैधतेला आव्हान देण्यात आलेले होते. कोर्टात या याचिकेसह अन्य ४० याचिकांवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर आता न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांचे १० टक्के आरक्षण कायम राखण्याचा निकाल दिला आहे. केंद्र सरकारने २०१९ साली १०३ व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून आर्थिक दुर्बलांना नोकरी आणि प्रवेशांमध्ये आरक्षणाची तरतूद केली होती. या घटनादुरुस्तीला न्यायालयात आव्हान दिल्यानंतर केंद्र सरकारने आपली बाजू मांडली होती. यामध्ये आर्थिक मागासलेपणामुळे कोणावरही अन्याय होऊ नये तसेच उच्च शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात सर्वांना समान संधी मिळावी म्हणून ही घटनादुरुस्ती करण्यात आली आहे, असे केंद्र सरकारने न्यायालयात यापूर्वी सांगितले होते.



**या कारणांमुळे सुप्रीम कोर्टाने मान्य केले आर्थिक आरक्षण**

- हे आरक्षण घटनेच्या चौकटीतच असल्याचे मत पाचपैकी 3 न्यायमूर्तींनी दिले आहे. सरकार गरीबी दूर करण्यासाठी सक्रीयतेने असे पाऊल उचलू शकते असे कोर्टाने म्हटले आहे.
- या आरक्षणासाठी एससी, एसटी, ओबीसी, एसईबीसी वर्गाला वगळणं घटनाबाह्य असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. पण कोर्टाने तो फेटाळला.
- या आरक्षणामुळे 50 टक्क्यांच्या मर्यादेचा भंग होत असल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा होता. पण केंद्र सरकारने हे आरक्षण 50 क्के लिमिटला धक्का न लागता, अधिक जागा निर्माण करुन दिले जात असल्याचा दावा केला होता.
- आर्थिक आरक्षणाच्या केसमध्ये 50 टक्के मर्यादा ओलांडली जरी गेली तरी ती घटनेच्या मूलभूत तत्वांचे उल्लंघन करत नाही. ही मर्यादा सामाजिकदृष्ट्या मागास आरक्षणासाठी आहे, त्यामुळे या केसमध्ये ती ओलांडली जाऊ शकत असल्याचे कोर्टाने मान्य केले.

# अब्दुल सत्तारांविरुद्ध राष्ट्रवादी आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केले आहे. सुप्रिया सुळेंच्या टीकेला उत्तर देताना सत्तारांची जीभ घसरली. त्यांनी गलिच्छ भाषेत टीका केली. सत्तारांच्या या टीकेनंतर राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी सत्तारांच्या मुंबई- औरंगाबादेतील घरावर मोर्चा काढून निषेध व्यक्त केला आहे. तर काही कार्यकर्त्यांनी सत्तारांच्या मुंबई येथील घरावर दगडफेक करत खिडकीच्या काचा फोडल्या. कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांची २४ तासांच्या आत मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अन्यथा सरकारला राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसने दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी याबाबतचे एक पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिले आहे. यातून त्यांनी हा इशारा दिला आहे. संबंधित पत्रात तपासे म्हणाले, विरोधीपक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये महाराष्ट्र राज्याच्या राजकीय संस्कृतीचा एक धागा गेल्या अनेक वर्षांपासून जपला आहे. यामध्ये विरोधीपक्ष आणि सत्ताधारी पक्षांनी राजकारणापलीकडे जाऊन सौहार्दाचे वातावरण जपले आहे. असे असताना आपल्या मंत्रिमंडळातील मंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादीच्या नेत्या व खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी केलेले वक्तव्य अत्यंत अशोभनीय आणि असंस्कृत आहे. याचा तीव्र निषेध करतो. खासदार सुप्रिया सुळे यांचा अपमान म्हणजे राज्यातील तमाम महिलांचा अपमान आहे. त्यामुळे अब्दुल सत्तार यांची तत्काळ हकालपट्टी करावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा राष्ट्रवादीचे प्रवक्ते महेश तपासे यांनी पत्रातून दिला आहे.




**सत्तारांची माफी :** राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिय सुळे यांच्याबद्दल किंवा कोणत्याच महिलेबद्दल मी काहीच बोललो नाही. महिलांची मने दुखावतील असा कोणताच शब्द बोललो नाही. परंतु, माझ्या बोलण्याने जर कोणाची मने दुखावली असतील तर मी त्याबद्दल खेद व्यक्त करतो आणि माझा शब्द मागे घेतो, सॉरी म्हणतो असे म्हणत अब्दुल सत्तार यांनी महिला वर्गाची माफी मागितली आहे. कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर गलिच्छ भाषेत टीका केली आहे. सत्तार यांच्या गलिच्छ भाषेतील टीकेवर राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झाली आहे.

# देव माशाच्या उलटीची विक्री करणाऱ्या टोळीवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** गेल्या आठवड्यात देव माशाची उलटी (अंबरग्रीस) विक्री करणाऱ्या एका टोळीस पकडल्यानंतर लगेचच कोल्हापूर पोलिसांनी आणखी एका टोळीचा छडा सोमवारी लावला. पोलिसांनी कोल्हापुरात दुचाकीवरून उलटी विक्रीच्या प्रयत्न करणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून दोन किलो १५ ग्रॅम वजनाची दोन कोटी एक लाख रुपये किमतीचे देव माशाची उलटी (अंबर ग्रीस) व इतर असा दोन कोटी दोन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोल्हापूर येथे उलटी विक्रीसाठी येणाऱ्या लोकांची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजय गोर्ले यांनी वेगवेगळी पथके तैनात केली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण भोसले व सहकार्यांनी कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानक ते पारीक पूल रस्त्यावर सापळा लावला. तेथे दुचाकीवरून आलेले करण



संजय टिपगडे, संतोष अभिमन्यू धुरी व जाफर सादिक महंमद बाणेदार यांना ताब्यात घेतले.त्यांच्याकडून वरून वरील प्रमाणे मुद्देमाल मिळाला आहे. त्यांना मुद्देमालासह शाहूपुरी पोलीस ठाण्यामध्ये हजर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. ३ दिवसापूर्वी पुणे – बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर जवळील सरनोबतवाडी येथे सुमारे तीन कोटी रुपयांची उलटी विक्री करणाऱ्या एका पथकाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते.


# पंढरीत निर्धार फाऊंडेशनची स्वच्छता मोहीम

## ३ टनांवर कचरा एका दिवसात संकलित : शंभरहून अधिक स्वच्छता दूत सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

पंढरपूर : कार्तिकी वारीनंतर पंढरीच्या विठ्ठल भेटीनंतर लाखो वारकरी आपापल्या गावी परतले. मात्र, मागे राहिलेला कचरा, अस्वच्छता दूर करण्यासाठी सांगलीतील निर्धार फाऊंडेशनच्या १०० स्वच्छता दूतांनी चंद्रभागा तीरी झाडलोट करीत सुमारे ३ टन कचरा एका दिवसात संकलित केला. कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे पार पडत असलेल्या वारीला महाराष्ट्र व इतर राज्यातून लाखो वारकरी बांधव सहभागी होत असतात यावेळी अस्वच्छतेचा मोठा प्रश्न निर्माण होतो. म्हणूनच पांडुरंगाचे चरणी एक वेगळ्या पद्धतीने भक्ती अर्पण करावी व प्रशासनाला सहकार्य या दोन्हीच्या हेतूने निर्धार फौंडेशनचे अध्यक्ष राकेश दड्डणावर यांनी सांगलीची स्वच्छता वारी पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दारी ही अनोखी मोहीम हाती घेतली. या मोहीमेत तब्बल शंभरहून अधिक स्वच्छता दूत सहभागी झाले होते. वारीनंतर रविवारी कर्मवीर पतसंस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील व आभाळमाया फौंडेशनचे प्रमोद चौगुले यांनी उपलब्ध करून दिलेल्या दोन एसटी बसमधून सांगलीतील १०० पंढरीच्या स्वच्छतेसाठी रवाना झाले होते. सकाळी अकरा ते सायंकाळी चार या वेळेत चंद्रभागा नदीकाठी असलेल्या घाटावर निर्माल्य, माती, चिखल, जुने कपडे, फोटो पसरलेले होते. स्वच्छता दूतांनी हा घाट परिसर स्वच्छ केला. यासाठी नगरपालिकेनेही जेसीबी व कंटेनरची व्यवस्था मदतीसाठी उपलब्ध करून दिली होती. लक्ष्मण नवलाई,भारत जाधव,योगेश कापसे यांनी स्वच्छता दूतांसाठी नाष्टा व जेवणाची व्यवस्था केली. या अभियानात भारत जाधव, अपर्णा कोळी, भारत पाटील, मेघा मडीवाळ, वर्षा जाधव, निलेश लोकरे, अनिल अंकलखोपे, वसंत भोसले, अनिरुद्ध कुंभार, सचिन ठाणेकर, रोहीत कोळी, सविता शेगुणशी, मनोज नाटेकर, प्रथमेश खिलारे, मानतेश कांबळे आदिंसह सहकार्यांनी श्रमदानात सहभाग घेतला.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## सेवाव्रती




आधुनिक केसरी

पहाटेची वेळ किती रम्य असते ! सर्वांनाच आवडते. उगवतीचा सूर्य जसा आल्हाददायक असतो तसाच मावळतीचा सूर्य देखील. दिवसभरात लोकांना ऊर्जा, प्रकाश देऊन सूर्य कृतार्थ होऊन मावळतीला निघालेला असतो. म्हणून तर भा रा तांब्यांसारखा कवी म्हणतो, ' मावळत्या दिनकरा, अर्घ्य तुज जोडून दोन्ही करा. ' आपल्या व्यवसायातून काहीशी निवृत्ती स्वीकारलेल्या परंतु असेच मावळत्या दिनकरासारखेच वंदनीय असलेले डॉ अलका कुलकर्णी आणि डॉ शशांक कुलकर्णी मला शहाद्यात भेटले. दोन्ही सेवाव्रतींची भेट झाल्याचा अतिशय आनंद मला झाला. त्यांचे कार्य डोळ्यांनी पाहता आले हे एक प्रकारचे भाग्यच !

डॉ सौ अलका कुलकर्णी आणि डॉ शशांक कुलकर्णी यांची आणि माझी भेट योगायोगाने पुण्याला विश्वकर्मा प्रकाशनाच्या कार्यालयात झाली. विश्वकर्माचे सहसंपादक आणि लेखक संदीप तापकीर यांनी माझा परिचय डॉ कुलकर्णी दाम्पत्याशी करून दिला. खान्देश हा आमच्या दोघांमधला समान दुवा होता. मग गप्पा झाल्या, ओळखी निघाल्या. रंगगंध या संस्थेने आयोजित केलेल्या साहित्य अभिवाचन स्पर्धेच्या निमित्ताने कुलकर्णी दाम्पत्य चाळीसगावी येऊन गेले होते. नंतर पुढे कोरोनाने डोके वर काढले. त्या दरम्यानच्या काळात त्यांचा आणि माझा संपर्क जवळजवळ तुटल्यासारखाच झाला होता. पण डॉ अलका कुलकर्णी लिखित ' माझी डॉक्टरकी - अनुभव गंभीर आणि गमतीदार ' या पुस्तकाचे प्रकाशन १५ ऑक्टोबरला होते. त्यासाठी मला संदीप तापकिरांचे आमंत्रण मिळालेच होते. नंतर डॉ अल्काताईंचाही आवर्जून या असा फोन आला आणि मी आणि सौ श्रद्धाने शहाद्याला जाण्याचे ठरवले. शहाद्याला पोहोचल्यावर डॉ कुलकर्णी दाम्पत्यांनी आमचे अतिशय प्रेमपूर्वक स्वागत केले. त्यांच्याकडेच आमचा मुक्काम होता. संदीप तापकीरही कार्यक्रमासाठी आलेलेच होते. पुस्तक प्रकाशनाचा सोहळा अतिशय देखणा झाला. त्या दिवशी शहाद्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ विश्वास पाटील आणि धुळे येथील प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ दिलीप पाटील प्रमुख पाहुणे होते.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## आपली फसवणूक न होण्यासाठी सतर्क राहावे

आधुनिक केसरी

मी अमुक एका बँकेतून बोलत आहे, तुमच्या मोबाईलवर आलेला ओ. टी. पी. सांगा. बँकेत डेटा अपडेट करण्याचे काम सुरु आहे. तुमच्या डेबिट कार्डचा पिन नंबर देखील सांगा; अशा स्वरूपातील जेव्हा फोन येतात तेव्हा फोन करणारी व्यक्ती अधिकृत असेलच असे नाही. फोन खरेच आपल्या बँकेतून आलेला असतोच असेही नाही. बँकेला अशी खातेदाराची गोपनीय माहिती फोनवरून घेण्याची गरजच नसते. आपल्या माहितीच्या आधारे आपल्या खात्यांतून पैसे परस्पर काढले जाईपर्यंत अनेकजण गाफील राहतात. त्यांच्याकडून समय सूचकता दाखविली जात नाही. ह्या प्रकारे फसवणूक करणाऱ्याची पद्धत कदाचित भिन्न असेलही, परंतू हेतू मात्र आर्थिक लुबाडणूक करणे हाच असल्याचे स्पष्ट होत असते. आपला पासवर्ड, इतर गोपनीय माहिती उघड न करण्याची जबाबदारी आपली स्वतःचीच असते. काहीवेळा अनावधानाने अथवा अज्ञानाने आपल्याकडून घडणाऱ्या क्षुल्लक परंतू अक्षम्य चुका स्वतःलाच भोवतात. भावनिक पातळीवर मैत्रीचे, नात्याचे, प्रेमाचे संबंध प्रस्थापित करून आर्थिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक बाबतीत इमोशनल ब्लॅकमेलिंग करण्याच्या घटना देखील अलीकडच्या काळांत मोठ्या प्रमाणांत उघड होत चालल्या आहेत. आर्थिक व्यवहार होत राहतो तो पर्यंत "तेरी बी चूप आणि मेरी बी चूप" अशी परिस्थिती असते. कालांतराने व्यवहार खंडित झाला कि, इमोशनल ब्लॅकमेलिंग सुरु होते. ह्याबाबतीत संबंधीताचा हेतू झटपट श्रीमंती प्राप्त करण्याचा असल्याचे संबंधितांना समजू शकत नाही. इमोशनमध्ये आडकायला काहीतरी नक्कीच भाग पाडत असते. संबंधीत व्यक्तीच्या इमोशन्स त्याच्या उणिवा ठरतात. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या इमोशनल ब्लॅकमेलिंगच्या समस्येचा गांभीर्याने विचार होणे जरुरीचे आहे. मुळातच त्यासाठी, फसवणूक होऊ नये म्हणून सतर्क राहावे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### प्रकटे पाषाणी | जनी संगे ||

ज्ञानास येऊ दे | प्रचितीचा गंध ||
जाण तो सुगंध | चंदनाचा ||१||

बोलणी करणी | एकरूप ज्याची ||
खाण आदर्शाची | राम जाण ||२||

ज्ञानाचिये ठायी | विनय शोभतो ||
अहंकार खातो | उभ्या जन्मा ||३||

मानपान सारे | मनाचे आभास ||
मृगजळी भास | काय कामी ? ||४||

अनुभवी वाचा | शुद्ध संतवाणी ||
प्रकटे पाषाणी | जनी संगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### विनवणी

अंबे एवढे तू करावे। मागे काही ना उरावे।
जळी स्थळी तू दिसावे। विषये मन ना जावे।।
अंबे एकचित्त व्हावे। रूपे तुझी आठवावे।
मुखी नाम तुझे यावे। मीपणे तुझ्यात विरावे।।
देहाभिमान ते नसावे। देहभान ते हरवावे।
देही विदेह होवावे। देह पुन्हा ना धरावे।।
ऐसे ध्यानरत व्हावे। भाव अंतरी जागावे।
प्रज्ञाचक्षु उघडावे। तू मी एकरूप व्हावे।।
कृपापान्हे तुझे प्यावे। रूप तान्हे मला द्यावे।
ऐसे वात्सल्य तुझिये। गंगेपरि ओथंबावे।।
कोणी न मज बोलवावे। मी न कोणां बोलवावे।
तुझिये चरणचि ठावे। ऐसे चंद्रहासे होआवे।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## प्रारब्ध म्हणजे न समजणाऱ्या गोष्टींचे कारण



आधुनिक केसरी

आपले ध्येय काय असावे हे ठरविण्याची बुद्धी माणसाला आहे, ती खालच्या प्राण्यांना नाही. हाच माणसांत आणि त्या प्राण्यांत फरक आहे. प्राण्यांना प्रारब्धाने आलेले भोग भोगावे लागतात, त्याचप्रमाणे माणसालादेखील आलेले भोग भोगावे लागतात. पण भगवंताचा पाठिंबा ज्याला आहे तो मागेपुढे सोयीने भोग भोगू शकतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्याही सर्व गोष्टी प्रारब्धाने चालतात. आपण जे मिळविले आहे ते स्वतःच्या प्रयत्नाने मिळाले, ही कल्पना गेल्याशिवाय देह प्रारब्धावर टाकता येणार नाही. 'माझे सर्व हे त्याच्या कृतीचे फळ आहे,' असे म्हटले तर क्रिया तर चालते, पण कर्तेपण राहात नाही. पुष्कळ गोष्टी अशा आहेत की, त्यांच्याकडे बोट दाखवून त्यांचे कारण अमुक असे आपण सांगू शकतो. पण काही गोष्टी अशा आहेत की, त्यांचे कारण आपल्याला दाखविता येत नाही. अशा वेळी, त्या प्रारब्धाने घडल्या असे आपण म्हणतो. प्रारब्ध म्हणजे न समजणाऱ्या गोष्टींचे कारण होय, असे म्हणायला हरकत नाही. संतांनादेखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदुःख त्यांना नाही. व्यवहारदृष्ट्या औषध घेऊन मग भोग भोगणे हाच मार्ग खरा आहे. बुवाने आपल्या सिद्धीने रोग बरा करणे किंवा टाळणे हे बरे नाही. त्यामध्ये बुवाची प्रसिद्धी होईल खरी, पण त्यात त्याचे स्वतःचे कल्याण नाही, तसेच लोकांचेही पण हित नाही. समजा, एक मनुष्य रस्त्याने चालला असताना वाटेत एक दहा रुपयांची नोट पडलेली आढळली. पूर्वसंस्काराप्रमाणे ती उचलून घेण्याची वासना त्याला होईल, पण ती प्रत्यक्ष उचलून घ्यावी किंवा न घ्यावी हे ठरविण्याचे स्वातंत्र्य त्याला आहे. म्हणून प्रारब्धाने देहभोग आला असता त्यामध्ये मनाची वृत्ती कशी ठेवावी हे स्वातंत्र्य त्याला आहे. म्हणून प्रारब्धाने देहभोग आला असता त्यामध्ये मनाची वृत्ती कशी ठेवावी हे स्वातंत्र्य आपल्याला आहे. ते प्रारब्धावर अवलंबून नाही. भगवंत सगुणात आला की त्यालादेखील प्रारब्धाचा नियम लागू झाला. आपला जन्मजात स्वभाव जरी वाईट असला तरे अभ्यासाने तो खात्रीने सुधारता येईल. जोपर्यंत आपल्या अंतःकरणात अवगुण आहेत तोपर्यंत आपली प्रगती होणे कठीण आहे. शेत पेरण्याकरिता ज्याप्रमाणे जमिनीची मशागत करायला पाहिजे, त्याप्रमाणे भगवंताचे प्रेम येण्यासाठी आपले अंतःकरण दुर्गुणांपासून स्वच्छ केले पाहिजे. एकदा असे अंतःकरण शुद्ध झाले म्हणजे भगवंतावाचून दुसरा कोणी नाही ही भावना टिकविणे, म्हणजेच अनुसंधान ठेवणे, फारसे जड नाही. अनुसंधान हे आपले ध्येय ठरवून, त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी कराव्या. त्याकरिता सर्वांनी मनापासून नाम घ्यावे, आणि आनंदात राहावे.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## एक आगळा संत!

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

साहेब कामासी नाही गेला, साहेब कोण म्हणेल त्याला. असा प्रश्न उपस्थित करणारा व्यवस्थापन कौशल्य जाणणारा दुसरा संत शोधूनही सापडणार नाही. येके ठाई बैसोन राहिला, तरी मग व्यापची बुडाला. इतक्या निःसंदिग्धपणे रामदास सल्ला देतात तो आजच्या काळातही लागू पडतो.

हा संत इतका प्रयत्नवादी आहे की देवदेव करीत बसा असे तो अजिबात सांगत नाही. देव पहाया कारणे, देवळे लागती पहाणे. असे ते सांगतात आणि पुढे लगेच म्हणतात. देवळे म्हणजे नाना शरीरे, तेथे जीवेश्वर राहिजे, नाना शरीरे, नाना प्रकारे भगवंत भेटे असेही लिहून टाकतात. म्हणजे देव पाहायचा असेल, त्याला भेटायचे असेल तर माणसांचीच सेवा करायला हवी, अशी त्यांची मसलत आहे. राखावी बहुतांची अंतरे, भाग्य येते तदनंतरे. असे रामदास म्हणतात तेव्हा त्यात आधुनिक मानव व्यवस्थापन शास्त्रच असते. नरदेहाचे उचित, काही करावे आत्महित, यथानुशक्त्या चित्तवित्त, सर्वोत्तमी लावावे. असे ते म्हणतात तेव्हा जन्माला येऊन काही ना काही चांगले करण्याची गरजच अधोरेखित करीत असतात. रामदासांनी दीर्घकालीन नियोजनास फार महत्त्व दिले आहे. मेळवती तितके भक्षिती, ते कठीण काळी मरोन जाती, दीर्घसूचनेने वर्ततीत, तेचि भले. अशा शब्दात ते भविष्यासाठी नियोजन कसे महत्त्वाचे आहे ते सांगतात. या नियोजनात मानवी मनव्यवस्थापन फार महत्त्वाचे असते. ते लक्षात घेऊन रामदास सांगतात. पेरले ते उगवते, बोलिल्यासारखे उत्तर येते, मग कटु बोलणे, या निमित्ये. असे ते विचारतात. म्हणजे गोड बोलून काम होत असेल तर उगाच कडवटपणा कशाला तयार करायचा, हे ते विचारतात, हे आधुनिक व्यवस्थापनशास्त्रच झाले. ज्याला काही मिळवायचे आहे, समाजासाठी काही करायचे आहे, त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. ते सोडवताना अनेकांची मदत घ्यावी ना ग ते. तशी ती जरूर घ्यावी, ज्यांना आपण तोंड देऊ शकत नाही, त्यांचा सामना करण्यासाठी तितक्याच तोलामोलाचा कोणी आपल्या वतीने उभा करावा, हे सांगताना त्यांच्यातील व्यवहारकुशलताच दिसते. ठकासी व्हावे ठक, खटासी व्हावे खट, लौंदासी आणून भिडवावा दुसरा लौंद. असे ते सहज सांगून जातात. हे सगळे करताना महत्त्वाचे काय, तर मनाचा निश्चय आणि त्या अनुषंगाने ध्येयप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न. ते जर चोख असतील तर नशिबावर अवलंबून राहावे लागत नाही, असे रामदासांचे म्हणणे आहे. जेणे जैसा निश्चय केला, तयासी तैसाची फळला. हे ते सांगून जातात. म्हणजे तुम्हाला आज जे काही मिळाले आहे ते तुम्ही काल जे काही केले त्याचे फळ आहे. काल उत्तम असेल तर आज आणि उद्या उत्तमच असेल, असा त्यांचा प्रयत्नवादी सल्ला आहे. असे करताना अभ्यास लागतो. तो डोळसपणे करावा. कोणापुढे तोंड उघडायाची वेळ आली तर आपला अभ्यास पक्का हवा, हा त्यांचा सल्ला आहे. त्यासाठी ते सांगतात.. अभ्यासोनी प्रकट व्हावे, ना तरी झाकोन राहावे, प्रकटोनी नासावे, हे बरे नव्हे. याचा साधा अर्थ असा की एखाद्या विषयावर बोलायच्या आधी अभ्यास हवा, तो नसेल तर आपलेच हसू होईल आणि ते काही बरे नाही. असे असले तरी ज्याला समाजकारण करायचे आहे, त्याला इतरांचे सहन करायची सवय असायलाच हवी. जो बहुतांचे सोसिना, त्यास बहुत लोक मिळेना. अशा सोप्या शब्दांत रामदास इतरांना मदत करण्याचे महत्त्व पटवून देतात. हे झाले समाजकारणाच्या बाबतीत. परंतु रोजच्या संसारातसुद्धा अनेकदा आपल्यावर मूर्खपणा केल्याची टीका होते. ती टाळायची असेल तर रामदासांची मूर्खाची लक्षणे वाचायलाच हवीत. जगात मूर्खाची लक्षणे सांगणारा दुसरा संत मिळणार नाही. चारचौघे बैसले जन, तयामधे करी शयन. त्यालासुद्धा मूर्ख ठरवले आहे रामदासांनी. म्हणजे सगळे बसून गप्पा मारतायत. त्यात एखादा गाढवासारखा लोळतोय. हे आपणही बघत असतो. सांगे वडिलांची कीर्ति. तो येक मूर्ख. म्हणजे उगाच बापाच्या नावाने मिशीला तूप लावीत फिरतो आणि स्वतः मात्र काही करीत नाही, तोही रामदासांच्या मते मूर्ख. असोनिया व्यथ, पथ्य न करी सर्वथा. म्हणजे एखादा आजार आहे आणि तरीही कुपथ्य करतोय.. तोही मूर्खच. आपणास जेथे मान, तेथे अखंड करी गमन. तोही रामदासांच्या मते मूर्ख. परस्त्रीसी प्रेमा धरी, श्वशुरगृही वास करी. याचीही गणना त्यांनी मूर्खातच केलेली आहे. घरी विवेक उमजे, आणि सभेमधे लाजे, शब्द बोलता निर्बुजे, तो येक मूर्ख. अशी उदाहरणे आपण अनेक बघतो. घरी बडबड करतात. पण चारचौघांत बोलायची वेळ आली की लाजतात, हा एक मूर्खपणाच. तस्कारासी ओळखी सांगे, देखिली वस्तु तेचि मागे. यालाही ते मूर्खच म्हणतात आणि त्यात अयोग्य ते काय? दोघे बोलत असती जेथे, तिसरा जाऊन बैसे तेथे. याला मूर्ख नाही म्हणावे तर काय?

# वाळूची चोरटी वाहतूक करणारे तीन ट्रॅक्टर पोलिसांनी पकडले

## २४ लाखांचा मुद्देमाल जप्त



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पोलिसांनी पकडून जप्त केला. ही कारवाई रविवार (दि.०६) तालुक्यातील आपेगाव शिवारात करण्यात आली.पोलिसांनी तीन आरोपी व वाळूसह ट्रॅक्टर असा २४,६५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून याप्रकरणी शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवशे यांना खबर मिळाली की रात्री आपेगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक सुरू आहे.या अनुषंगाने रविवारी रात्री पोलिसांनी पाळत ठेवून वाळूसह अवैध वाळू वाहतूक करताना तीन ३ ट्रॅक्टर त्यांच्याकडे रॉयल्टी पावती नसल्याचे आढळून आले.पोलिसांनी ट्रॅक्टर जप्त करीत पोलिस ठाण्यात आणला.या प्रकरणी आरोपी १) सुनील वैजिनाथ जाधव, वय ३० वर्ष, २)बाळू फकिरचद आडाव वय ३३ वर्ष,३) शरद हिरालाल धनुरे सर्व रा.आपेगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून यांचा ताब्यातून ३ ट्रॅक्टर ट्रॉलीसह एकूण - २४, ६५,००० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे ही कारवाई मनिष कलवानिया, पोलिस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण,प्रकाश बेले,उप विभागीय पोलिस अधिकारी गंगापूर यांचा मार्गदर्शनाखाली एम. टी. सूरवसे,पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन सिल्लेगाव,पो.ह.दाणी,पो.ह.तात्यासाहेब बेदरे,पो.ह.सोनवणे,पो ना.उमेश गुढे,पॉ का.सातपुते, चालक पो.का.पठाण यांनी केली आहे.

# मनोरंजनाच्या व्याख्या बदलल्या



सौ. सीमा श्रीकांत देशमुख
अमरावती

आधुनिक केसरी

**नुकतीच दिवाळी पार पडली आहे. चार पाच दिवस चालणारी ही दिवाळी कधी संपूच नये कधी कधी असं वाटतं. हो, कारण दिवाळीतील ते दिवस भुररकन उडून जातात. मला आठवतं लहानपणी जेव्हा दिवाळी यायची तेव्हा खूप आनंद व्हायचा. कारण त्यावेळीची ची दिवाळी वेगळी असायची.**

त्यावेळेस शेनामातिने सारवलेलं अंगण असायचं. फराळचे सर्व पदार्थ घरीच केलेला असायचे आणि मला आठवतं दिवाळीतील मुख्य आकर्षण म्हणजे जेव्हा बाजारात रंग, रांगोळ्या, रांगोळीची पुस्तके घ्यायला जायचं त्यावेळेस मुख्य आकर्षण म्हणजे दिवाळी अंक! बुक स्टॉल वर गेल्यावर खूप प्रकारचे दिवाळी अंक दिसायचे. यात प्रामुख्याने आवाज, जत्रा गृहशोभिका, गृहशोभा, सामना, माहेर या अंकांना जास्त मागणी असायची. त्यातला कुठला खरेदी करावा हा मोठा पेच असायचा. दिवाळी अंका शिवाय दिवाळी साजरी व्हायचीच नाही. प्रत्येक घरी दिवाळीचा एक तरी अंक दिसायचा. वाचक मंडळींसाठी दिवाळी अंकाचा हा वेगळा फराळच असायचा. कारण तो काळच वेगळा होता. त्यावेळी आता सारखे मोबाईल नव्हते. सुट्ट्यांमध्ये दिवाळी अंक, पुस्तक वाचण्याची मज्जा होती आणि दिवाळीची सुट्टी पण भरपूर मोठी असायची. मग काय! आठ दिवस आधीपासून दिवाळीची सुरुवात असायची, दिवाळी संपल्यानंतर तुळशीच्या लग्नापर्यंत दिवाळी साजरी व्हायची. या दिवसांमध्ये लहान मुलांची तर खूप चंगळ असायची कारण दिवाळीची सुट्टी खूप मोठी असायची. मग सुट्टीचा मनमुराद आनंद लुटायचा भरपूर पुस्तक दिवाळी अंक वाचून काढायचे. मला आठवतं माझ्या लहानपणी दिवाळी अंकात विशेष करून. विविध पाककृती, तसेच काही लघुकथा, कविता, मांडवाखाली म्हणून एक सदर असायचे यात काहींच्या आयुष्यातील लग्नाच्या वेळी आलेले गमतीशीर प्रसंग असायचे ते वाचताना खूप मज्जा यायची. या पलीकडे काही उपयुक्त माहिती अजून बरेच काही या अंकात असायचे. दिवाळीतील रंगांसारखा दिवाळी अंक रंगबिरंगी असायचा.




दिवाळीचे काही कार्टून व त्यावरील जोक्स,तसेच दिव्यांचे चित्र तसेच त्या काळातील काही हीरो हीरोइन यांनी दिलेल्या शुभेच्छा, मुलाखती वाचण्यात गंमत असायची. सर्व गोष्टींनी हा अंक परिपूर्ण असायचा. त्यावेळी मोबाईल नव्हते जी काही माहिती असेल ती या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचायची. आता काळ बदलला त्याप्रमाणे दिवाळी अंकांचे स्वरूपही बदलत चालले आहे. लोकांना मनोरंजनाच्या अनेक गोष्टी उपलब्ध आहेत. लोकांच्या मनोरंजनाच्या व्याख्या देखील बदलल्या आहेत. आजकालची तरुण पिढी वेब सिरीज आणि मोबाईल मध्ये गुंतलेली आहे. त्यांना कथा कविता वाचण्यापेक्षा मोबाईल मधली वेब सिरीज बघण्याचा जास्त जास्त रुची असते. त्यामुळे तरुण पिढीला आणि लहान मुलांना दिवाळी अंक काय असतो? किंवा पुस्तकं काय असतात ?ते वाचणे माहीतच नाही. शाळेतील पुस्तका व्यतिरिक्त आवांतर वाचन आजची मुलं करत नाही. आज-काल डिजिटल अंक देखील उपलब्ध आहेत.आणि खूप प्रकारचे अंक देखील उपलब्ध आहेत. पण जी मजा पूर्वीच्या काळी होती ती मात्र आता नाही. पूर्वीच्या काळी दिवाळी आणि दिवाळी अंक अस एक समीकरण होतं. जणू काही ती एक परंपराच होती. आजही ही परंपरा वाचक प्रेमींनी अस्तित्वात ठेवावी असं वाटतं. आणि दिवाळी अंक जरूर खरेदी करावा. आणि तो वाचावा. कुठेतरी ही परंपरा संपुष्टात येते की काय ! याची भीती ही वाटते.

# संभाजी ब्रिगेडने ‘हर हर महादेव’ बंद पाडला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** संभाजीराजे छत्रपती यांनी चित्रपट निर्मात्यांना दिलेल्या इशाऱ्यानंतर संभाजी ब्रिगेड या विषयावरून आक्रमक झाली आहे. संभाजी ब्रिग्रेडच्या कार्यकर्त्यांनी पिंपरी शहरामध्ये सुरू असलेला हर हर महादेव चित्रपट बंद पाडला आहे. विशाल टॉकीजमध्ये हा शो सुरू होता, तेव्हाच संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते थिएटरमध्ये घुसले. थिएटरमध्ये असणाऱ्या सर्व प्रेक्षकांना बाहेर काढून त्यांनी हा शो थांबवला. यामुळे थिएटरमध्ये काहीकाळ तणावाचे वातावरणात निर्माण झाले होते. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित चित्रपटांमध्ये इतिहासाची मोडतोड करण्यात येत असल्याचा आरोप संभाजीराजे छत्रपती यांनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. यावेळी त्यांनी अभिनेता सुबोध भावेची मुख्य भूमिका असलेला ‘हर हर महादेव’ आणि महेश मांजरेकर दिग्दर्शित ‘वेडात वीर दौडले सात’ या चित्रपटांचा उल्लेख केला होता. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संभाजीराजेंनी मराठी निर्माते, दिग्दर्शकांना जाहीर इशाराही दिला होता.



# पुण्यात कंपनीवर छापा; पाच जण ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जनावरांचे दूध वाढवण्यासाठी बेकायदेशीरपणे दिल्या जाणाऱ्या औषधाच्या कारखान्यावर पुणे पोलिसांनी छापा टाकला आहे. 52 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अंमली पदार्थ विरोधी पथक आणि औषध विभागाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. समीर अन्वर कुरेशी (वय 29, रा. कलवड वस्ती, लोहगाव), बिश्वजीत सुधांशु जाना (वय 44, रा. पुरबा बार, विलासपुर, पुरबा मदीनीनपुर, पश्चिम बंगाल), मंगल कनललाल गिरी (वय 27, तिराईपूर, पश्चिम बंगाल), सत्यजीत महेशचंद्र मोन्डल (वय 22, रा. नबासन कुस्तीया पंचायत, प. बंगाल) आणि श्रीमंता मनोरंजन हल्दर (वय 32, रा. नलपुरकुर, मंडाल, प. बंगाल) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.



# एम.आय.एम. युवा शहर उपाध्यक्षपदी आतिफ मोईन शेख

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशनचे आतिफ मोईन शेख यांची एम.आय.एम पक्षाच्या यूवा शहर उपअध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना तसे नियुक्ती प्रमाणपत्र एम. आय. एम. पक्षाचे तालुका अद्यक्ष राहुल वानखेडे यांच्या आदेशाने तालुकापाद्यक्ष तालूका अजित जाधव यांच्या हस्ते देण्यात आळे या वेळी यूवा शहर अध्यक्ष अकरम बेग व सहकारी ऊपस्थीत होते. दरम्यान शेख यानी पक्षाचे ध्येय धोरणे राबुन संघटन व पक्षवाढीसाठी प्रयत्न करावे असेही नियुक्तीपत्रात म्हटले आहे.



# किंग कोहली

आधुनिक केसरी

भारतीय क्रिकेटचाच नाही तर जागतिक क्रिकेटमधील स्टार फलंदाज विराट कोहली याला नुकत्याच मानाच्या 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. ऑस्ट्रेलियात सुरु टी20 विश्वचषक स्पर्धेत विराट अप्रतिम खेळी करत असल्याने त्याला याच खेळीची जणू पोचपावती मिळाली आहे. विराटसोबत वर्ल्डपमध्ये चांगली कामिगिरी करणारे आणखी दोन खेळाडूही नॉमिनेट झाले होते यामध्ये झिम्बाब्वेचा सिकंदर रझा आणि दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड मिलर यांचा समावेश होता. पण विराटची खेळीही विराट असून प्रेक्षकांनीही त्यालाच पसंती दिल्याने विराटने पुरस्कारावर नाव कोरलं आहे. तर महिलांमध्ये पाकिस्तानची निदा दार विजयी झाली आहे. मागील बरीच वर्षे भारताकडून क्रिकेट खेळणाऱ्या विराटने काही महिन्यांपूर्वी कर्णधारपद सोडले. 2019 च्या अखेरीसपासून खराब फॉर्मात विराट होता. 70 शतके ठोकणाऱ्या विराटला 71 वं शतक काय करता येत नव्हता. पण बरीच मेहनत आणि सराव करुन अखेर 2022 च्या आशिया कपमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध विराटने शतक ठोकले आणि पुन्हा एकदा तो फॉर्मात परतला. त्याने पुन्हा एकदा आपला कमाल खेळ जगाला दाखवण्यास सुरुवात केली असून ऑस्ट्रेलियात सुरु टी20 विश्वचषक स्पर्धेत विराट टीम इंडियासाठी अतिशय महत्त्वाची कामगिरी करत आहे. भारताचे पाच सामने विश्वचषकातील खेळले असून यातील तीन सामन्यात विराटनं अर्धशतक झळकावत तो नाबाद राहिला आहे. त्यामुळे विराट भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलत असल्याचे दिसत आहे. विश्वचषकाची सुरुवात झाल्यापासून विराट कोहली दमदार फॉर्ममध्ये दिसत आहे. सर्वात पहिला भारताचा सामना पाकिस्तानसोबत झाला. ज्यात एकीकडे भारतीय फलंदाजी ढासळत असताना विराटने एकहाती झुंज दिली. त्याने सामना जिंकवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. 53 चेंडूत नाबाद 82 धावा केल्या. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात नेदरलँडविरुद्ध 44 चेंडूत नाबाद 62 धावा विराटनं केल्या. मग दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विराट 12 धावाच करु शकला. पण मग बांगलादेशविरुद्ध विराट 44 चेंडूत 62 धावा करुन पुन्हा फॉर्मात परतला. त्यानंतर नुकत्याच झालेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात विराटने 26 धावा केल्या असून अशारितीने एकूण 5 सामन्यात त्याने 246 धावा केल्या आहेत. आयसीसीने क्रिकेटमध्ये उत्साह वाढवण्यासाठी हा पुरस्काराची सुरुवात केली होती. प्रत्येक महिन्याला हा पुरस्कार दिला जातो. दरम्यान, पुरूष आणि महिला संघातील जे खेळाडू महिन्याभरात चांगली कामगिरी करून दाखवतात. त्यांची निवड करून त्यापैकी एकाला हा पुरस्कार दिला जातो. पुरुषांमध्ये वरील खेळाडूंना तर महिला क्रिकेटमध्ये भारताची जेमिमा रॉड्रीग्ज, दिप्ती शर्मा आणि पाकिस्तानच्या निदा दार यांना नामांकित करण्यात आले आहे.

# नांदेडच्या 'दिवाळी पहाट'मध्ये दडलंय तरी काय ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**नांदेड जिल्हा प्रशासन, गुरूद्वारा बोर्ड, मनपा नांदेड आणि नागरी सांस्कृतिक समिती यांच्या 'विद्यमाने' दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिवाळी पहाटचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सहभागी कलाकारांनी कला सादर केली, त्यांचे कौतूक केले पाहिजे. मी पहाट कार्यक्रमाच्या विरोधात मुळीच नाही. पूर्वीपासून स्पष्ट करत आलो आहे. पण या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासन व समिती हे दोघे जण कार्यक्रमासाठी गैरमार्गाचा अवलंब करत आहेत,त्याला विरोध आहे. याबाबतची माझी भूमिका पुन्हा एकदा मांडत आहे.**

नांदेडात स्थानिक स्वराज्य संस्था, विविध प्रतिष्ठाने, सांस्कृतिक मंच तसेच लोकप्रतिनिधी दिवाळी पहाटसारखे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेत असतात. त्यास कोणाचाही विरोध नाही. तसेच नांदेड मनपा असे कार्यक्रम घेणाऱ्या संस्थाना मदत करत असते. पण दिवाळी पहाट हा प्रशासनाच्या 'विद्यमाने' घेतला जात आहे ? याला आक्षेप आहे. त्यात शासकीय अधिकारी समन्वयक आहे? यात विद्यमाने याचा अर्थ वतीने तर समन्वयक मध्यस्थी करणारा, याला दुसरा शब्द दलाल म्हंटले जात जिल्हा प्रशासनाला मर्यादा आहेत. त्यांना कायद्यात चौकटीत, शासकीय नियमाने पालन करावे लागते.पण येथे प्रशासन नियम धब्यावर बसवत आहेत, हे दिसतेय! प्रशासन नेमकी कोणती मदत करते? हे मात्र लपवून ठेवले जात आहे. त्यांनी जिल्हा नियोजन विकास मंडळात या पहाटसाठी विशेष आर्थिक तरतूद करुन घ्यावी व ढोल वाजवित त्यांनी खुशाल कार्यक्रम घ्यावा. पण 'ताकाला जाऊन भांड लपवू नये'. बहुतेक प्रशासनाला सांस्कृतिक भूकवाले म्हणजे शहरातील सांस्कृतिक क्षेत्राचे ठेकेदार अथवा प्रतिनिधी आहेत, असा गोड समज झालेला असावा. यातील काही मंडळीचा तर सांस्कृतिक चळवळीशी संबंध नाही, ते यात केवळ 'चमकोगिरी'करण्यासाठी आहेत. नांदेड शहरात नावाजलेल्या सांस्कृतिक संगीत क्षेत्रात अनेक मंडळीच्या संस्था आहेत. प्रशासनाकडून दरवर्षी याच सांस्कृतिकवाल्यांना ठेकेदारी व मदत कशी काय मिळते? याबाबत निकष तरी काय? हे सांस्कृतिक भूकवाले नवीन जिल्हाधिकारी आले की, त्यांची ओळख करून घेतात, त्यानंतर कार्यक्रमाची गळ घालतात, इतकेच नव्हे, दवाबतंत्राचा वापर करतात. याला जिल्हा प्रशासनही बळी पडते आहे? याचे आश्चर्य वाटते. जिल्ह्यात आतापर्यंत तीन जिल्हाधिकारी आले व गेले, पण सांस्कृतिक ठेकेदारी कायम! २०१७ पासून प्रथम माहिती अधिकार, प्रथम अपील, औरंगाबाद विभागीय आयुक्त यांच्याकडे विनंती अर्ज करूनही माहिती दिली जात नाही. आता राज्य माहिती आयोगाकडे अपील प्रलंबित आहे. या दिवाळी पहाटमध्ये एवढे गुपीत काय? यात दडलय तरी काय ? प्रशासन माहिती देण्यास का टाळटाळ करत आहे? एकीकडे हेच जिल्हा प्रशासन आमचा कार्यक्रमाशी सबंध नाही, असे लेखी देते, तर दुसरीकडे प्रशासनाच्या वतीने जाहीरपणे कार्यक्रम घेतला जातोय. ही विसंगती नाही काय? यात जिल्हाधिकारी स्वतः कार्यक्रमाला हजेरी लावतात. यात 'तेरी भी चूप मेरी भी चूप'या अशी मिलीभगतच आहे. या दिवाळी पहाटचे समन्वयक मला शोधत घरी आले होते, त्यांनी पहाटसाठी आर्थिक मदत देणाऱ्या कंत्राटदाराची यादी दाखविली होती. पण त्यांना यादी दिली नाही. उलट त्यांनी मला आमिष दाखविले. 'आम्ही तुम्हाला मदत करू, तुमचा सन्मान करू, तुम्ही गप्प बसा, लिहू नका' असे म्हणाले होते. यासाठी विविध मार्गाने प्रयत्न झाले.तेंव्हा माझ्या लक्षात आले,' पाणी कुठ तरी मुरतेय? मी अमिषाला बळी पडणारा नाही.मला केवळ लेखी माहिती द्या, असे मी त्यांना सांगितले. मला कोणतीही आशा नाही. मी चाळीस वर्षाच्या पत्रकारितेत आकसाने कधी लिखाण केलेले नाही. पण समाजातील भ्रष्ट प्रवृत्तीच्या विरोधात भरपूर लिखाण केलेल आहे. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याचे सागवान लाकूड चोरी प्रकरण लावून धरले होते. हे प्रकरण तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्यापर्यंत गेले होते. हे नांदेडच्या ज्येष्ठ पत्रकारांना माहित आहे. तसेच रॉकेल भ्रष्टाचार प्रकरणात तर मला मारण्याची सूपारी दिली गेली होती, पण गरीब रॉकेल विक्रेत्याची बाजू मांडत असल्याने त्यानेच ती नाकारली. असे प्रकरणे लावून धरली त्याचा छडा लावला. तेंव्हा मी दडपणाला बळी पडणारा नाही, घाबरणारा नाही, हे लक्षात घ्यावे. मी कार्यक्रमावर यासाठी एक रूपया जरी घेत असतील व त्याची नोंद न ठेवणे व हिशोब ठेवणे बंधनकारक आहे.मग प्रशासन कार्यक्रमाची बैठक घेतली नाही काय? यावर पहाट पैसा खर्च होत नाही काय? जर खर्च होत असेल तर तो कोण करतोय? यात पारदर्शकपणा का नाही? जर असेल छातीठोकपणे माहिती देण्यास काय भीती आहे. या कार्यक्रमाचे समर्थन करणारी बरीच मंडळी आहेत. ही मंडळी पण गप्प हे? याचे नवल वाटते! रात्री चोरी करून सकाळी साखर वाटणाऱ्याला दानशूर या समाजसेवक म्हणावयाचे का? असे तथाकथित सांस्कृतिकवाल्याचे टोळके असेच कार्य



प्रश्न उपस्थितीत करून लिहिताच या पहाटच्या सांस्कृतिक भूकवाल्यांच्या शेपटीवर पाय पडल्यासारखे वाटले! त्यांनी 'दिवाळी पहाट' विरोध अशी हेकाटी सुरु केली होती. त्यांनी लोकांना भडविण्याचा प्रयत्न केला. नांदेडचे जागृत व समाजदार नागरिक त्यांच्या अप्रचाराला बळी पडलेले नाहीत. हे खर आहे! समाजातील नीतिमान, समाजसेवक, प्रतिष्ठीत, राजकीय बडी मंडळी जर गैरमार्गाचा अवलंब करत असतील, तर त्यांना विरोध करणे सोप नसतं. ही मंडळी विविध मार्गाने दवाब, संकटे निर्माण करतात.अशी मंडळीच्या विरोधात केला की, आर्थिक, मानसिक, दादगिरीचा त्रास सहन करावा लागतो. यात मला नांदेड जिल्हा प्रशासनाने शेतीवादात व आर्थिक अडचणीत आणले.अनेक जण सल्ला देतात, जाऊ द्या ना! 'आभाळच फाटलंय, तुम्ही कुठं-कुठं शिवणार'. हे खर आहे.भ्रष्टाचार हा सर्वात क्षेत्रात वाढलेला आहे. भ्रष्टाचाराविरोधात माझा छोटासा प्रयत्न आहे. राज्यात अवैध सावकारी व्यवसायाने प्रश्न सतत लावून धरत आहे. आपण निः स्वार्थ भावनांनी लोकांची बाजू मांडली तर सामान्य माणूस साथ देतो, यावर माझा विश्वास आहे. पण जवळीची माणसेच साथ देत नाहीत, दूर जातात.यातून वैयक्तीक चिखलफेकही होते, पण ती घाण त्यांच्याच अंगावर पडते, हे त्यांना कळत नाही. अश्या स्वार्थी मंडळीचा राग येत नाही. यात प्रशासनाचा सहभाग, आहे. ते प्रशासनाला हाताशी धरून नांदेडकरांची प्रतारणा करत आहेत. माझा लिहिण्यामागे कोणाबद्दल वैयक्तिक आकस, विरोधक, स्पर्धकही नाही. मी बघ्या नाही आणि टाळ्या वाजविण्याऱ्यांपैकी नाही.प्रशासनाकडून गैरमार्गाचा अवलंब, गोपनियता पाळणे, माहिती न देणे पांघरण घालणे असे कत्य करणाऱ्या प्रवृतीच्या विरोधात आहे.जिल्हा प्रशासन नागरी सांस्कृतिक समितीला मदत करत असेल,तर या नागरी सांस्कृतिक समिती सहाय्य धर्मादाय आयुक्ताकडे अधिकृत नोंदणीकृत केली आहे काय? समितीने नोंदणी केंव्हा केली? या समितीने तीन वर्षाचा लेखा परिक्षण केले आहे काय? याची जिल्हा प्रशासनाने खात्री केली काय? तरी पण जिल्हा प्रशासन सहभाग व मदत करते? हे गैर नाही काय? त्यात भाजपा आणि काँग्रेस नेत्यांचे पाठबळ मिळते आहे. मला वयोमानामुळे त्यात डोळ्यांचा आजार, त्यात कौटूंबिक अडचणीमुळे पाठपुरावा करण्यात करता आला नाही. आता ही जबाबदारी जागृत नांदेडकरांनी आहे. त्यांनी या दिवाळी पहाट कार्यक्रमाची प्रशासनाकडून माहिती घ्यावी, या विरोधात आवाज उठवावा. नांदेडचे पत्रकार मूग गिळून बसले आहेत. मी लेखात प्रश्न विचारले आहेत! ते चुकीचे आहेत काय? या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळावी, एवढीच अपेक्षा आहे.

# झोप विकत घेता येत नाही



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जगातील प्रत्येक वस्तूची देवाणघेवाण होऊ शकते. आपण सुख-दुःख वाटून घेऊ शकतो, पण झोप ही अशी गोष्ट आहे, जी आपण कधीही शेअर करू शकत नाही. ती कुठली संपत्तीही नाही,ज्याचा साठा करून ठेवावा. खरे तर आजच्या युगात, ज्याला चांगली झोप लागते, त्याच्यापेक्षा श्रीमंत आणि आनंदी दुसरा कोणीही नसेल. जे जागल्या डोळ्यांनी पूर्ण रात्र जागून काढतात त्यांना फुटपाथवर निवांत झोपलेल्या माणसांचा हेवा वाटल्याशिवाय राहणार नाही, पण त्याच्याकडून काही होऊ शकत नाही.**

काहींना सर्व सुविधा असतानाही झोप लागत नाही, तर काहींना नुसती हाताची उशी करून जमिनीवर झोपलं तरी गाढ झोप लागते. काही लोकं रात्र या अंगावरून त्या अंगावर काढून थकून जातात तर काहींना आडवं व्हायचा अवकाश लगेच घोरायला लागतात. बाजारात झोप विकत मिळत नाही हे खरे आहे. कित्येकदा खूप वेळ मेहनत करूनही झोप येत नाही. डुलकी ही झोपेची छोटी बहीण मानली जाऊ शकते. दुपारच्या जेवणानंतरची एक छोटीशी डुलकीदेखील अनेक तासांच्या गाढ झोपेइतकीच असते. शरीरातील अनेक आजार चांगल्या झोपेने दूर होतात.
झोपेचा संबंध थेट मेंदूशी आहे. जन्मानंतर, मूल पूर्णपणे निष्पाप असते, म्हणून अठरा तासांपर्यंत झोपते. जसजसा तो मोठा व्हायला लागतो, तसतसा तो चुका आणि वाईट विचारांत गुरफटायला लागतो, त्यामुळे त्याच्या वाट्याची झोप त्याला मिळत नाही. ज्याने कधीही कोणाचे नुकसान केलेले नाही, त्याचे घोडे मात्र पूर्णपणे विकले गेलेले असतात, म्हणजेच तो चांगल्या झोपेला पात्र आहे. झोपेचा थेट संबंध आपल्या रोजच्या दिनक्रमाशी असतो. दिवसभर चांगला विचार करा, चांगलं काम करा, कुणाचं वाईट करू नका, वाईट चिंतू नका, कुणालाही वाईट बोलू नका, तर रात्री नक्की खूप चांगली झोप लागेल. पण आजकाल हे कोणाला जमू शकतं? त्यामुळे तो चांगल्या आणि पूर्ण झोपेपासून वंचित राहतो.
पुरेशी झोप घेण्यासाठी तुम्हाला काहीही द्यावं लागत नाहीत. फक्त निर्दोष असायला हवं. पण निर्दोष असणं मोठं कठीण आहे.
चांगल्या झोपेसाठी अंथरुणावर चांगले विचार आणणं आवश्यक आहे. तुमचा ताण खोलीच्या बाहेर ठेवा. झोपेचा आणि टेन्शनचा आकडा छत्तीसचा आहे. जिथे टेन्शन असेल तिथे झोप येत नाही. जिथे चांगली झोप लागते तिथे टेन्शन असू शकत नाही.
एकाद्या दिवशी एकाद्या गरजवंताला मदत करण्याचा प्रयत्न करा, बघा त्यादिवशी तुम्हाला चांगली झोप लागल्याचे दिसेल. काही मिळवण्याचा आनंद चांगली झोप देईल अथवा नाही देईल,पण काही देऊन आपण चांगली झोप मिळवू शकतो. ते देणं चांगल्या विचारांचं का असेना! एखाद्याला हलके स्माईल देऊनही चांगली झोप येते. झोप शारीरिक स्थितीपेक्षा मानसिक स्थितीवर अधिक नियंत्रण ठेवते. मन स्थिर असेल तर उत्तम आणि शांत झोपेसाठी ते अधिक उपयुक्त ठरते.
आपण झोप विकत घेऊ शकत नाही, पण त्यासाठी गोळ्या घेऊ शकतो. तेही डॉक्टरांच्या सांगण्यावरून. परंतु यानंतरही झोप येईलच याची शाश्वती नाही. येऊही शकत नाही. जरी ती आली तरी शरीराला विश्रांती देऊ शकत नाही,उलट ती आपल्या शरीराला दुसऱ्या आजारासाठी तयार करेल. तुम्हाला इच्छा असूनही चांगली झोप येत नाही. लहानपणी ऐकलेली अंगाई झोपताना गुणगुणल्यास कदाचित तुम्हाला झोप येऊ शकेल. कारण लहानपाणीच्या अंगणात भटकल्याने आपलं बालपणही परत येतं. आपल्या बालपणात झोपेची कधीच वेळ ठरलेली नसते. कित्येकदा असं घडतं की, झोपड्यांमध्ये घोरण्याचा आवाज घुमतो मात्र महाल रात्रभर जागाच असतो. याचे एकमेव कारण म्हणजे झोपडपट्टीतले लोक आपापसात आणि कुटुंबात प्रेमाने राहतात. छोट्याशा घरात एक कुटुंब शांततेत राहतं. पण राजवाड्यांत किंवा मोठ्या बंगल्यात जाण्यासाठी प्रेम तळमळत राहतं.
नैसर्गिकरित्या झोपेने पेंगुळलेले डोळे फक्त मुलांचे असतात, कारण ते निष्पाप असतात. चांगल्या झोपेनंतर जेव्हा डोळे उघडतात तेव्हा त्यातून प्रेम टपकतं. आपल्या आजूबाजूला अनेक निष्पाप डोळे आहेत, त्यांना ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे डोळे एक तर लहान मुलांचे असतात किंवा वृद्धांचे! निरागसतेची भावना तरुणांच्या डोळ्यात क्वचितच दिसते. त्यामुळे जेव्हा केव्हा तुम्हाला चांगली झोप घेण्याची इच्छा असेल, तेव्हा दिवसभरात काही ना काही चांगले काम कराच, त्याचबरोबर मुलाला तुमच्या शेजारी झोपवा, त्याच्या निरागस डोळ्यांकडे बघून तुम्हालाही चांगली झोप लागेल. हा एक छोटासा प्रयोग आहे, एकदा करून बघा, तुम्ही चांगल्या झोपेचे धनी व्हाल.-मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
RNI : MAH/2021/82566, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAH/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समाजातील वाढते नैराश्य : कारणे व उपाय



सौ. प्रतिमा अरुण काळे
संपर्क क्र. 9405042938

आधुनिक केसरी

**नैराश्य किंवा उदासीनता,म्हणजेच Depression ही मनाची एक उदासीन अवस्था आणि भारतात सर्वाधिक आढळणारा मानसिक आजार किंवा मुड बदलणारा हा आजार आहे.या आजराने ग्रासलेल्या व्यक्तीला नेहमी उदास व निराश वाटते आणि दैनंदिन कामे तसेच आनंददायी गोष्टीतील आवड कमी होते.भारतात,जवळ -जवळ २० ते ३०% व्यक्तींना कधीतरी हा आजार होत असतो.पौगंडावस्थेनंतर पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हा आजार होण्याचे प्रमाण दुप्पट असते.नैराश्य ही मानसिक आजाराची आणि त्यानंतर येणाऱ्या शारीरिक आजारांची सुरुवात असते.कोणाशी न बोलण्याची इच्छा,एकटे एकटे वाटणे,सतत आपणच दोषी आहोत का? मनात घर करून बसलेली खिन्नता,सतत उदास वाटणे,कोणत्याही गोष्टीत रुची न वाटणे,ही थोडक्यात नैराश्याची काही महत्त्वाची लक्षणे आहेत.दैनंदिन जीवनातही बिघाड निर्माण करणारी,अवस्थता निर्माण करणारी ही केवळ नैराश्याची कारणे समजून घेऊन उपयोग नाही.त्यावर मार्ग काय,याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.**

नैराश्य दूर करण्याचे उपाय आपल्या हातात पण,आपण मात्र असहाय्य होऊन, दुःखी होऊन राहतो.खरे तर हे सगळे कळत असते,पण नैराश्य ही स्थिती अशी आहे की सगळे कळते पण वळत मात्र काहीच नाही.तेव्हा मात्र आपल्या मनाला आनंदाच्या दिशेने वळवू शकेल,निदान दुःखी मनःस्थितीकडे पाठ फिरवायला लावू शकेल,असे कोणते तरी सकारात्मक बळ हवे.निराश मनःस्थितीला नैसर्गिक तऱ्हेने आनंदी बनवणे हा अगदी सोपा उपाय आहे. नैसर्गिक तऱ्हेने म्हणजे स्वतःची दैनंदिनी बनवा,अन् त्यात दिवसाची छोटी-छोटी ध्येये,सुविचार,आपले उत्तम कार्य लिहून काढा.स्वयंशिस्तीचे बळ फार मोठे असते. त्यातून येणारे समाधान आणि स्फूर्ती ही तुम्हाला अधिकाधिक आत्मविश्वास आणि आनंद देते.प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात अशी वेळ एकदा तरी येते जेव्हा एखादी व्यक्ती खूप निराश होते आणि नैराश्यात जाते.काही दुःख किंवा एखाद्या वाईट घटनेमुळे काही काळ हे घडणे सामान्य गोष्ट असू शकते.परंतु,जर ही परिस्थिती बऱ्याच दिवसांपर्यंत अशीच राहिली तर, ती नैराश्याचे लक्षण असू शकते.यावर वेळेवर नियंत्रिण न आणल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात,मानसिक व शारीरिक ही.

**नैराश्याची कारणे :**

१)एकांतात जावून बसणे,थोड्या आवाजाने ही चीड चीड होणे. २)सतत उदास किंवा निराश वाटणे आणि चीडचीड होणे. ३)थकवा जाणवणे व शक्ती नसल्यासारखे वाटणे. ४)मन बधिर,अस्वस्थ आणि असमाधानी होणे. ५)भविष्याविषयी विनाकारण काळजी करणे. ६)कोणतेही काम करावेसे न वाटणे. ७)भूक कमी होणे,जेवणाची इच्छा न होणे किंवा वजन कमी होणे.तर कधी प्रचंड भुक लागणे,सतत खात बसणे. ८)दुःखी असणे,सतत काळजी करणे, सतत रडू येणे. ९)शांत व पुरेशी झोप न लागणे,तर काहींना मात्र प्रचंड झोप लागणे. १०)सकाळी उठल्यानंतर उत्साही न वाटणे. ११)निर्णयक्षमता कमी होणे. १२)कामावरती लक्ष न लागणे,काही काम करण्याची इच्छाच कमी होणे. १३)स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण होणे. १४)स्वतःला दोषी समजणे,जसे आपण काहीच कामाचे नाही,आपले कधीच चांगले होणार नाही,आपल्याला नेहमी दुःखांचा सामोरा करायचा आहे,आपल्या वाट्याला सुख येणे या जन्मात शक्य नाही,आपण मदत करून चुकलो का ?किंवा,आपल्याला कोणीही मदत करू शकणार नाही,आपला जन्मच व्हायला नको होता,सगळे आपल्यालाच दोषी का समजतात,आपण माणूस नाही का? आपल्याला मन नाही का ?आपल्याला कोणी तरी समजून घेणारे हक्काचे माणूस नाही,जेथे मनसोक्त सांगता येवू शकेल,बिनधास्त रडू शकू असे वाटणे. १५)शरीरसंबंधाची इच्छा न होणे. १६)दैनंदिन कामात अजिबात रस नसणे. १७)आत्महत्येचे विचार सतत मनात घर करून राहणे कधी कधी त्यासाठी प्रयत्न ही करणे. १८)तीव्र मानसिक वेदना हे नैराश्याचे सर्वात महत्त्वाचे लक्षण आहे.

नैराश्यात वरील लक्षणे कमी-जास्त प्रमाणात होत असतात.व्यक्तीमध्ये एकदम बदल होतात जेव्हा नैराश्याचा वेग आणि प्रमाण जास्त असते.आणि ते कमी असेल तर व्यक्तीमधील बदल खूप हळू होतात आणि तो आजारी आहे हे लक्षातही येत नसते.नैराश्याचे जरी नेमके ठळक कारण स्पष्ट सांगता येत नसले तरी रूढी,परंपरा,समाजाकडून दिली जाणारी वागणूक,मित्र मंडळी,नातेवाईक यांचे वागणे,नोकरी गमावणे,घटस्फोट घेणे,जवळच्या व्यक्तीचा मृत्यू,महिलांची पाळी गेल्यावर,कौटुंबिक इतिहास,गर्भधारणेदरम्यान हार्मोनल बदल,दीर्घकालीन आजार आणि जास्त मद्यपान,काही तणावग्रस्त घटनाही नैराश्यास कारणीभूत ठरू शकतात,त्यामुळे डिप्रेशन ही येऊ शकते. डिप्रेशन दरम्यानची काही लक्षणे आधीच दिसू लागतात.निद्रानाश, दुःखाबद्दल वाढलेली संवेदनशीलता, वजन वाढणे किंवा कमी होणे,थकवा, चिडचिडेपणा,एकटे राहण्याची इच्छा इत्यादी लक्षणांचा यात समावेश होतो.हे संकेत वेळेत समजून घेतल्यास परिस्थिती व्यवस्थित हाताळता येते. वाढत्या गरजा किंवा कोणतीही गोष्ट आपल्या मनासारखी न झाल्यामुळे कधी कधी अगदी लहान गोष्टींमुळेही बरेच व्यक्ती नैराश्याच्या गर्तेत अडकतात आणि त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन जाते.अशा परिस्थितीतून काही व्यक्ती लवकर बाहेर पडतात,तर काही व्यक्ती त्याच गोष्टीमध्ये गुरफटून राहतात,किंवा त्यात स्वतःला गुरफटून ठेवतात,अन् मग त्याने शारीरिक आजाराला ही सामने जावे लागते.

**उपाय :** १)जेव्हा जेव्हा एकटे राहण्याची कल्पना मनात येते तेव्हा मित्रांसह वेळ घालवा. जवळच्या व्यक्तीशी म्हणजे नातेवाईक किंवा मित्र यांच्याशी बोलणे कारण मित्रांचा,नातेवाइकांचा भावनिक आधार हा खूप महत्वाचा असतो. २)आराम करत तणावाचे नियोजन करणे. ३)स्वतःसाठी वेळ देणे व छंद जोपासणे. ४)



आपल्या विचारांतले निराशा निर्माण करणारे विचार शोधून त्यावर काम करणे. ५)पुरेशी झोप आणि पौष्टिक आहार घ्या. ६)आपल्या दिनचर्येमध्ये व्यायाम,योगा आणि ध्यान यांचा समावेश करा. ७)आपल्यातल्या कमतरता पाहण्याऐवजी आपले सामर्थ्य ओळखा,यासाठी आपण थेरपिस्टचीही मदत घेऊ शकता. ८)जर,आपण यावर औषधे घेत असाल तर डॉक्टरांचा सल्ला आवश्य घ्या. ९)डॉक्टरांचे थेरपी सेशन चुकवू नका आणि आपल्यास जे वाटते ते डॉक्टरांना प्रामाणिकपणे सांगा. १९)नैराश्यात समुपदेशनाचा खास उपयोग होतो. २०)मानसिक आघात. २१)अकारण केलेले आरोप. २२)जीवालगांशी झालेले वादविवाद. २३)गरिबी,बेरोजगारी,प्रेमभंग. २४)शारीरिक आजार,ब्लड प्रेशर -स्टेरॉइडस व काही पित्तशामक औषधांचे सेवन. २५)लहानपणी घडलेला एखाद्या दुर्दैवी प्रसंग २६)दारू किंवा अमली पदार्थाचे व्यसन असल्यास नैराश्याचा धोका अधिक असतो. २७)मोबाईल व इंटरनेटचा अतिवापर करणे याने सुद्धा नैराश्य येते. २८)नेहमीच्या जीवनातील दगदग,नकार, विरह,अपयश,पैशांचे व्यवस्थापन या गोष्टींनी ताण वाढतो. २९)अपघात,जिवावर बेतलेला प्रसंग, ३०)सामाजिक बहिष्कार,बलात्कार, सार्वजनिक ठिकाणी झालेला अपमान. ३१)पूर-भूकंप-दरड कोसळण्यासारखी नैसर्गिक संकटे यामुळे तणाव वाढतो व परिणामी नैराश्य येऊ शकते. ३२)जागतिक आरोग्य संस्थेनुसार, एचआयव्ही,इतर संसर्गजन्य रोग तसेच हृदयरोगानंतर निर्माण होणारे रोग नैराश्येला कारणीभूत असतात.आणि नैराश्य हे मानसिक दुर्बलता वाढण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. काहीवेळा काही कारण नसतानाही नैराश्य येऊ शकते.हे मुख्यतः मेंदूत होणाऱ्या रासायनिक बदलामुळे किंवा आनुवांशिकतेने होऊ शकते.बाळंतपणानंतर होणाऱ्या संप्रेरकातील बदलामुळे अनेक स्त्रियांना नैराश्य येऊ शकते. किंवा पाळी गेल्यानंतर ही असे घडू शकते. जर वरील कोणतीही लक्षणे सतत १५ दिवसानंतर आहे तशीच जाणवली तर आपण मानसोपचार तज्ज्ञाकडे जाणून यावर उपचार घेणे गरजेचे असते किंवा समुपदेशक यांचे सेशन पूर्ण करणे गरजेचे असते.समुपदेशकांशी केवळ गप्पा मारून निराशा कमी होते,हा खूप मोठा गरसमज आहे.समुपदेशन म्हणजे एक प्रकारचा उपचार असतो त्यात रुग्ण व समुपदेशक या दोघांनाही मेहनत घ्यावी लागते,अभ्यास करावा लागतो. नैराश्याचे प्रमाण कमी असेल,योग्य प्रशिक्षित समुपदेशक असेल आणि सांगितलेले बदल करण्याची रुग्णात क्षमता असेल तर समुपदेशनाचा चांगला उपयोग होतो.औषध आणि समुपदेशन,दोन्ही एकत्र घेणे हा अचूक उपाय ठरतो.

**भारताची परिस्थिती**

नैराश्य किंवा अवसाद जगभरातील सर्वसाधारण आरोग्य समस्यांपैकी एक आहे. गेल्या काही दशकांमध्ये नैराश्याचे प्रमाण वाढले आहे.लहान मुले,तरुण,तरुणी,वयस्क,सर्वानाच या आजाराने वेढले आहे.भारतात १५ कोटी लोक कोणत्यांना कोणत्या मानसिक दडपणाखाली जीवन जगत आहेत.त्यापैकी सुमारे ७ कोटी नैराश्यग्रस्त लोक आहेत.भारतात नैराश्याला बहुतांश वेळा दुर्लक्षित केले जाते.अनेक नैराश्यग्रस्त रुग्ण विशेषतः निम्न स्तरातील व्यक्ती आपल्या फॅमिली डॉक्टरकडून उपचार घेतात.भीतीमुळे ते मानसशास्त्रज्ञांकडे जात नाहीत किंवा लक्षणे दर्शवत नाहीत.पुरेसे मनोविकारतज्ज्ञ आणि सर्वसामान्यांना परवडतील असे उपचार उपलब्ध होत नाहीत. नैराश्य बरेचदा महिला मी शारीरिक आजारी आहे,या करणांमागे लपवतात.महिलांच्या मध्ये नैराश्याचे प्रमाण खूप जास्त आहे पण,त्यांना मिळणारा उपचारांवरचा खर्च मात्र पुरुषांच्या मानाने कमीच असतो.

सर्व सर्वेक्षण,संशोधने,अभ्यास असे दर्शवतात,की भारतातील सर्व आर्थिक नुकसानीचे एक प्रमुख कारण मानसिक आरोग्य आहे.त्यावर स्वतः नेच मात करायची आहे,अन् भारताला अव्वल राष्ट्र म्हणून सिद्ध करायचे आहे.कोणत्याही छोट्या मोठ्या कारणांनी डिप्रेशन मध्ये न जाता मनाने बळकट बनायचे आहे.

# सामाजिक व वैधानिक न्यायाच्या विषयावर भाष्य करणारी कादंबरी : आक्रांत आरक्षण आणि विक्रांत योद्धा



भारत सोनवणे
मोबा. 9307918393

आधुनिक केसरी

**एकूण २५५ पृष्ठसंख्या असलेली ही कादंबरी औरंगाबाद येथील "कैलाश पब्लिकेशन्सने" प्रकाशित केली आहे. ही कादंबरी फक्त कादंबरी नसून, राष्ट्रीयसमाज जीवनातील उपेक्षित, वंचित समाज घटकांच्या, दलित-पिडित, अन्यायग्रस्त व अभावग्रस्त वास्तव जीवनाची हे श्वेतपत्रिकाच आहे. सरांनी आजवर समाजातील वंचित समाजाचा केलेला अभ्यास, आरक्षण, आरक्षणाचा अर्थ, त्याची परिभाषा, व्याप्ती, मर्यादा आणि दर्जा, सुविधा व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षणाची समन्याय वितरण व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आणि सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्याचे महत्त्व हे या कादंबरीच्या लेखनामाध्यमातून सरांनी विशद केले आहे, या अश्या अनेक विषयांना घेऊन अनेक पात्रांचा आधार घेऊन हे सर्व आपल्या समोर मांडले आहे.**

साधारण पंधरा दिवसांपूर्वी आरक्षणाचे अभ्यासक, वर्गीकरणाचे प्रणेते, थोर विचारवंत आणि साहित्यिक आदरणीय डॉ.अंबादास सगट सर यांच्याशी झालेल्या बैठकीत भेट मिळाली.

यापूर्वी सरांचे संदर्भित विषयाला घेऊन असलेलं कार्य, आणि या माध्यमातून अवघ्या देशभरात त्यांनी जोडलेली माणसे आणि सरांचे या विषयावरील अभ्यासपूर्ण विचार यापूर्वी वेळोवेळी ऐकून होतो, वाचून होतो.  एकाच शहरात रहिवासी असल्याने सरांनी वरील विषयाला घेऊन दिलेला लढा केलेलं कार्य जवळून बघूनही होतो.

एकूण २५५ पृष्ठसंख्या असलेली ही कादंबरी औरंगाबाद येथील "कैलाश पब्लिकेशन्सने" प्रकाशित केली आहे. ही कादंबरी फक्त कादंबरी नसून, राष्ट्रीयसमाज जीवनातील उपेक्षित, वंचित समाज घटकांच्या, दलित - पिडित, अन्यायग्रस्त व अभावग्रस्त वास्तव जीवनाची हे श्वेतपत्रिकाच आहे.

सरांनी आजवर समाजातील वंचित समाजाचा केलेला अभ्यास, आरक्षण, आरक्षणाचा अर्थ, त्याची परिभाषा, व्याप्ती, मर्यादा आणि दर्जा, सुविधा व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षणाची समन्याय वितरण व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आणि सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्याचे महत्त्व हे या कादंबरीच्या लेखनामाध्यमातून सरांनी विशद केले आहे,या अश्या अनेक विषयांना घेऊन अनेक पात्रांचा आधार घेऊन हे सर्व आपल्या समोर मांडले आहे.


थोडक्यात सांगायचे तर डॉ. अंबादास सगट सरांनी "जाती वर्गीकरण आणि आरक्षणाचे समन्याय वितरण" या विषयाला वाहून घेतलेलं उभं आयुष्य आणि हा सर्व पट उलगडणारी ही कादंबरी आहे.

कादंबरी विषयी सांगायचे तर कादंबरीमधील सरांनी उभा केलेला नायक आणि त्यांचे चळवळीतील सर्व सहकारी आरक्षणाचे समन्याय वितरण व त्यासाठी जातीचे उप-गटात वर्गीकरण या विषयाला घेऊन सामाजिक व संवैधानिक न्यायाची उभी राहणारी लोक चळवळ ही या कादंबरीची रूपरेषा आहे.

कादंबरी वाचत असताना आपणही या चळवळीचा, या लढ्याचा एक भाग होऊन  जातो व तिच्याशी समरस होऊन ही सर्व प्रक्रिया हा सर्व लढा आपण समजून घेतो. दोन बैठकीत ही कादंबरी मी वाचून संपवली ही कादंबरी फक्त वाचून पूर्ण न होणारी नाहीये तर हा संवैधानिक न्यायाचा लढा हा आपल्याला समजून घ्यावा लागतो.

तो न समजून घेतल्याने काय परिणाम आजवर भोगत आलो आहे अन् तो समजून घेतल्याने काय परिणाम,काय बदल आपल्या आयुष्यात घडले आहे याचे आत्मपरीक्षण आपण करायला हवे. जेव्हा हे सर्व आपल्याला समजून येईल तेव्हा संपूर्ण एक वर्तुळ पूर्ण झालेलं असेल.

वरील सर्वच विषयांना घेऊन कादंबरीच्या माध्यमातून सरांनी अनेक अंदोलने, सभा, बैठकी, आणि अंततः शासनाने आयोजित केलेल्या "सामाजिक न्याय अदालत" माध्यमातून अनुसूचित जाती-जमातींच्या वर्गीकरणाचा आणि त्याच्यासाठी असलेल्या आरक्षणाच्या वितरणाचा किंवा वाटपाचा विषय आणि त्या ठिकाणी सरांनी आपली मांडलेली बाजू आणि त्या मागणीला मिळालेली मान्यता आणि सरांच्या आणि चळवळीच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांना आलेले यश हे सर्व




सविस्तर रुपात सरांनी आपल्या कादंबरीत कैद केलं आहे. आरक्षण म्हणजे काय ? अनुसूचित जाती - जमाती म्हणजे काय ? कायदेशीर सुरक्षितता आणि आधिकार, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या संवैधानिक आरक्षण.

अनुसूचित जाती असण्याचे सामाजिक व संवैधानिक निकष काय आहेत ? शिक्षण, सेवा, आर्थिक विकासासाठी उद्योग-व्यवसाय आणि तत्सम इतर बाबींमध्ये दिलेल्या सोयी-सवलती, पुरवलेल्या सुविधांचे विशेष तरतूद, प्रतिनिधित्व अश्या अनेक विषयांना सविस्तर, मुद्देसूद, अभ्यासपूर्ण लेखन सरांनी वेळोवेळी घेतलेल्या बैठका, सभा.

यांच्या माध्यमातून अमृतराव सागर या नायकाच्या माध्यमातून आणि चळवळीच्या इतर सदस्यांच्या आधारे सामान्य जनेतेला समजविण्याचे आणि समाजाला वास्तव परिस्थिती दर्शवण्याचे काम सरांनी केले आहे.

आरक्षण आणि ऐतिहासिकता प्राचीन काळातील घटनांचा आढावा जाती-वर्ग आधारित आरक्षण, जाती आधारित आरक्षण खूल्या वर्गातील आरक्षण इतर निकषांवर आधारित आरक्षण, परिस्थिती सापेक्ष आरक्षण, व्यवस्थापकीय वाटा ज्येष्ठ नागरिक आरक्षण, वर्गीकरण अनुसूचित जातीचे अ.ब.क.ड गटात वर्गीकरण या विषयांना सरांनी सविस्तर लेखन केले आहे. हे वेळोवेळी चळवळीच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या बैठका, सभा या माध्यमातून समाजातील लोकांना समजविण्याचा प्रयत्न केला आहे.

"क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ, महाराष्ट्र" आणि "भारतीय दलित संसद, महाराष्ट्र" या दोन्ही संघटना. अन् सरांचे लिखित चौदा पुस्तकांची आजवरची या विषयांना घेऊन निर्माण केलेली साहित्यसंपत्ती, हे सर्व सरांच्या या चळवळीतील कामाचा आणि समाजाचे आपण काही देणं लागतो ही भावना हे सर्व लक्षात घेण्यासारखे ठरते. सर्वांनी नक्की वाचायला हवी अशी ही कादंबरी आहे.

# मेकिंग ऑफ अ न्युरोसर्जन : प्रसंग ६ सायलेंट हिरोज्!



डॉ. प्रवीण सुरवशे
संपर्क क्र. 7738120060

आधुनिक केसरी

**साधारणपणे दोन वर्षे झाली असतील या गोष्टीला. मी त्यावेळी J.J.hospital,Mumbai येथे न्युरोसर्जरी डिपार्टमेंटमध्ये लेक्चरर म्हणून काम करत होतो. मेन हॉस्पिटल बिल्डिंगच्या चौथ्या आणि पाचव्या मजल्यावर न्युरोसर्जरी डिपार्टमेंट होते. रहाण्यासाठी जवळच हॉस्टेलमध्ये ८×१० ची रूम मिळाली होती. रूम लहान होती तरीदेखील माझ्या मिसेसनी तेवढ्यात पूर्ण संसार थाटला होता.मिसेस त्यावेळी मुंबईतील दुसऱ्या एका हॉस्पिटलमध्ये ॲनेस्थेशिया शिकत होत्या. आमचा दोघांचाही २४ तास ड्युटी व नंतर १२ तास ऑफ असा दिनक्रम असायचा. त्यामुळे नुकतंच लग्न झालं असलं तरी एकमेकांना भेटायला फारसा वेळ नाही मिळायचा!**

तो दिवस अगदी नेहमीसारखाच होता. मिसेस त्यांची ड्युटी संपवून रात्री घरी आल्या होत्या. त्यामुळे मी देखील सर्व कामं संपवून लवकर रूमवर आलो. मिसेस ची स्वयपाची लगबग सुरु होती. एकीकडे भाजी शिजत होती व दुसऱ्या शेगडीवर पोळी भाजणं चालू होतं आणि गरम चहा तयार होता. घरी आल्यावर फ्रेश होऊन आम्ही चहा घेत बसलो होतो. एवढयात माझ्या ज्युनिअर चा फोन आला.लक्ष्मीकांत बोलत होता . "सर , लवकर कॅज्युअल्टी मध्ये या. अमनदीपला (नाव बदलले आहे.) काहीतरी झाले आहे. '' आणि फोन कट ! फोनवरती तो बोलत असताना मला जाणवत होतं की तो कोठे तरी धावत चाललाय कारण त्याचा श्वास फुलला होता आणि त्याला धापही लागली होती. हा फोन विचित्र होता. आज पर्यंत त्याने मला कधीही असा अर्धवट फोन केला नव्हता. पण प्रकार गंभीर आहे समजून मी पटकन जायला निघालो. आमचं बोलणं ऐकून मिसेसनी विचारलं " हा अमनदीप कोण ? मी सांगितलं "तो आमचा ॲनेस्थेशिया डिपार्टमेंट मधील सिनिअर रेसिडेंट आहे ( शिकाऊ डॉक्टर )."त्यांच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. त्या म्हणाल्या मी लिफ्ट बोलावते, तुम्ही पट्कन कपडे बदलून निघा. मी सातव्या मजल्यावर रहात असल्याने लिफ्ट यायला वेळ लागायचा. मी पट्कन कपडे घातले,पायात चप्पल तशीच व बाहेर पळालो. मिसेसनी तो पर्यंत लिफ्टचं दार उघडून ठेवलं होतं. लिफ्टचं दार बंद होता होता त्या म्हणाल्या "अहो, काळजी घ्या! त्याला काहीही होऊ देऊ नका प्लीज!" आणि लिफ्टचं दार बंद झालं.

माझ्या डोक्यात विचारांचं काहूर माजलेलं! काय झालं असेल अमनदीपला? आज सकाळीच तर तो मला आणि लक्ष्मीकांतला भेटला होता. मला म्हणाला "सर , आज मेरी ड्युटी है| मैं ही कॉल डायरेक्टर हूं | (कॉल डायरेक्टर म्हणजे हॉस्पिटल मध्ये होणाऱ्या सर्व इमर्जन्सी ऑपरेशन्सना भूल देणारा. त्याच्या हाताखाली ज्युनियर ॲनेस्थेटिस्टची टीम असते व केसेसचा सिरिअसनेस बघून कॉल डायरेक्टर कुठली केस आधी घ्यायची व कुठली नंतर हे ठरवातो.तसेच एखादा पेशंट फार सिरिअस वाटत नसेल तर ती केस पोस्टपोन करुन दुसऱ्या दिवशी घ्यायला सांगायचा अधिकारही त्याला असतो.) तो म्हणाला, " सर,कोई टेन्शन नही आज ! कितने भी पेशंट आने दो, सारे केसेस करेंगे ! मी त्याच्याकडे बघून हसलो व म्हणालो, "ठीक है, देखते है! भूलना मत | तुम्हे वादा निभाना पडेगा | ऑलरेडी हमारे 2-3 पेशंटस् वेटिंगमे हैं|" "ठीक है सर! कोई टेन्शन नहीं!!" असे म्हणून तो निघून गेला.

तोच लक्ष्मीकांत मला म्हणाला " सर, हा खूप सिन्सिअर मुलगा आहे. आजपर्यंत आपली एकही केस याने पोस्टपोन (पुढे ढकलणे)होऊ दिली नाही. रात्रभर स्वतःपण जागतो आणि सर्व टीमला पण जागवतो."

तो सकाळचा प्रसंग डोळ्यासमोरून जात होता, आणि मी लिफ्टमधून बाहेर पडलो. झपाझप पावलं टाकत मी पुढे चाललो होतो. आजूबाजूला आणखी बरेच इतर डिपार्टमेंट्सचे डॉक्टर देखील पळत कॅज्युअल्टीकडे जात असताना दिसायला लागले. जसा कॅज्युअल्टीच्या दारात पोहचलो तोच दोन रेसिडेंट समोर आले आणि म्हणाले ,"अरे सर, किधर हो आप? जल्दी चलो ना, अमनदीप को देखो ! " मी कॅज्युअल्टी मध्ये शिरलो तर तिथे ३० / ४० डॉक्टर्स जमले होते. गर्दीतून वाट काढून पुढे आलो.

समोरचे दृश्य पाहून ह्रदयाचे ठोके थांबतील की काय अशी अवस्था झाली.

अमनदीपला रक्ताच्या थारोळ्यात बेडवरती मधोमध झोपवलं होतं . डोक्याला मार लागून डोक्याचे आणि चेहऱ्याचे दोन भाग झाले होते. चेहरा ओळखू येत नव्हता. एक बाजूचा डोळा बाहेर पडला होता आणि मेंदूचा बराचसा भागही बाहेर आलाहोता. तशाही अवस्थेत त्या दुभंगलेल्या चेहऱ्यातून ॲनेस्थेटिस्टनी श्वासाची कृत्रिम नळी श्वासनलिकेत टाकली होती व व्हेंटिलेटर द्वारे कृत्रिम श्वासोच्छ्वास चालू केला होता.चारी बाजूला रक्त होतं. त्याच्या आजूबाजूला उभे राहिलेल्या डॉक्टरांचेही कपडे रक्ताने माखले होते.

मी लक्ष्मीकांतकडे प्रश्नार्थक नजरेने बघितलं . तो म्हणाला, "सर हा सेंट् जॉर्ज हॉस्पिटलची ड्युटी संपवून गाडीवरून जे.जे हॉस्पिटलला ड्युटी साठी येत होता.( सेंट् जॉर्ज हॉस्पिटल हे जे.जे. हॉस्पिटलचीच ब्रँच आहे. त्यामुळे जे.जे. हॉस्पिटलमधील एक ॲनेस्थेशियाची टीम या हॉस्पिटलमध्ये पोस्टेड असते. ) बहुतेक कुणीतरी मागून ठोकर मारली असावी. नक्की माहीत नाही ! पण याची बाईक घसरली आणि डोकं डिव्हायडरवर आपटलं. पोलिस त्याला लगेचच इकडे घेऊन आलेत.

काहीच करण्यासारखे राहिलं नव्हतं. पुढच्या काही क्षणात त्याचे ह्दय बंद पडेल असं दिसत होतं .मी पाठीमागे वळून बघितलं तर डॉ. वर्णन वेल्हो सर देखील समोरच उभे होते. डॉ. वर्णन वेल्हो हे जे.जे. हॉस्पिटलच्या न्युरोसर्जरी डिपार्टमेंटचे प्रमुख आहेत. खूप हुशार आणि शिस्तबद्ध व्यक्ती. आजपर्यंत अनेक अवघड केसेस त्यांनी यशस्वी करून दाखवल्या होत्या. पण आताचा प्रसंग वेगळा होता. काहीच करणे शक्य वाटत नव्हते. आता मी आशाळभूत नजरेनं सरांकडे बघत होतो. एक वेडी आशा वाटत होती की, सरांनी म्हणावे, " PRAVIN, WE CAN STILL SAVE HIM ! TAKE HIM IN OT' (आपण अजूनही याला वाचवू शकतो!त्याला पट्कन ऑपरेशन थिएटर मध्ये घे.) पण सर शांत उभे होते. त्यांच्या नजरेमध्ये स्पष्ट दिसत होतं की सर्व काही संपलं आहे.

इतक्यात मागून एका रेसिडेंटनी खांद्यावर हात टाकला.तो अमनदीपचाच सहकारी होता. तो मला म्हणाला , "अरे सर, कुछ तो करो ना प्लीज ! ऐसे चुपचाप क्यों खडे हो ? बाकी टाईम तो आप हमपे चिल्लाते रहते हो, 'पेशंट को जल्दी ऑपरेशन थिअटर मे लो| इसको जल्दी ॲनेस्थेशिया दो|( भूल देणे)' अभी हमारे दोस्त को जरुरत है, तो कूछ भी नही कर रहे हो ! बोलो ना सर ! ऑपरेशन थिएटर में शिफ्ट करने का ऑर्डर दो ना| हम सब तैयारी करते है|



बोलो सर , कूछ तो बोलो !" एवढं म्हणून तो माझ्या गळ्यात पडला आणि मोठमोठ्याने रडू लागला. त्याचे सांत्वन करणे शक्यच नव्हते. त्याचे इतर सहकारी त्याला माझ्यापासून वेगळे करत साईडला घेऊन गेले. तिथं असलेल्या सर्वांना कळून चुकलं होतं की, आता काहीच करणं शक्य नव्हतं .अमनदीप शेवटची घटका मोजत होता!

तोच वर्णन सरांनी मला बोलावलं . ते म्हणाले , " काही करण्यासारखे नाही. पण डोक्याला ड्रेसिंग तरी करून घेऊया.कारण चुकून जर अमनदीपचे कुणी नातेवाईक आले तर ते त्याला या अवस्थेत बघू शकणार नाहीत ." मी ड्रेसिंग करायला त्याचं डोकं वर उचललं , तर रक्ताची धारच लागली! कसेबसे आम्ही ड्रेसिंग केले आणि बाजूला झालो.

पुढच्या एक दोन मिनिटांमध्ये त्याच्या ह्दयाचे ठोके कमी होत गेले आणि त्याचं ह्दय बंद पडलं. लगेचच आम्ही CPR (छातीवर दाब देऊन ह्दय चालू करणे.) चालू केलं . ७ / ८ डॉक्टर्स एका पाठोपाठ एक उभे होते. समोरचा CPR देऊन दमला की लगेचच दुसरा त्याची जागा घेई. ह्दयाला शॉक देखील देण्यात आले. पण फार उपयोग होत नव्हता. एवढ्या वेळात जवळपास १०० / १५० डॉक्टर कॅज्युअल्टीमध्ये जमा झाले होते. हॉस्पिटलचे डीन डॉ. लहाने सर, ॲनेस्थेशिया डिपार्टमेंटच्या प्रमुख डॉ.कोंडवीलकर मडम तसेच इतर सर्व सिनिअर डॉक्टर्सही तेथे आले होते. इतक्यात हॉस्पिटलचे सुपरिटेंडेंट मला बाजूला घेऊन म्हणाले, "सर, याच्या घरी आपल्याला कळवावे लागेल. " तो पंजाब प्रांतात राहणारा होता आणि त्याचे कोणीच नातेवाईक आजूबाजूला रहात नव्हते.त्याच्या मित्रांकडे चौकशी केली पण कोणालाच त्याच्या परिवाराविषयी फार माहीत नव्हते. तोपर्यंत पोलिसांनी त्याच्या खिशामध्ये सापडलेला मोबाईल आम्हाला दिला व म्हणाले. "यामध्ये कुठल्या नातेवाईकाचा नंबर दिसतोय का बघा सर!" आम्ही मोबाईलमधील सर्व नंबर चेक केले. सर्व नंबर्स जे.जे मधील मित्रांचे होते पण एक नंबर त्याने माँ म्हणून सेव्ह केला होता. सरांनी मला नंबर सांगितला. तो नंबर मी माझ्या मोबाईलमध्ये सेव्ह करून घेतला आणि त्यांच्याबरोबर बाहेर ग्राउंडवर आलो.

आता त्याच्या घरी हे सर्व सांगण्याची मोठी जबाबदारी होती. काय सांगावे? कसे सांगावे ? हा विचार करीतच मी त्या नंबरवर फोन केला. एव्हाना रात्रीचे दोन वाजले होते. पलिकडून लगेचच फोन उचलला गेला. वयस्कर बाईंचा आवाज होता तो. त्या म्हणाल्या, "हाँ बोलो बेटा! सोए नही अभी तक? तुम्हारा तो ये रोज का हो गया है अब ! खाना तो खाया के नही?"

मी विचारात पडलो या बाई मला बेटा का म्हणताहेत? मी कुठं त्यांचा मुलगा आहे! त्यांनी मला ओळखलं कसं? आणि माझी नजर माझ्या हातातल्या फोनकडे गेली. गडबडीत मी अमनदीपच्या फोन वरूनच त्याच्या घरी फोन लावला होता आणि त्याच्या आईला वाटले होते की अमनदीपच बोलतोय. ज्या आईला फक्त आपला मुलगा व्यवस्थित जेवलाय किंवा नाही याची काळजी आहे त्या आईला मी कुठल्या शब्दात हे सर्व सांगणार होतो? माझ्या तोंडातून शब्द फुटेनात. मी पटकन फोन कट केला आणि सरांना म्हणालो, "मी नाही सांगू शकत त्याच्या आईला!" इतक्यात परत त्याच्या आईचा फोन येऊ लागला. मी सरांना फोन दिला, "सर तुम्हीच सांगा प्लीज मला नाही जमणार त्या आईला रात्री झोपेतून उठवून ही बातमी द्यायला."

आता सरांनी जबाबदारी घेतली ते म्हणाले "माँ जी मैं अमनदीप का दोस्त बोल रहा हूँ |. उसका भाई या पिताजी है क्या? बात करनी थी| "

त्या आई विचारत राहिल्या, "मुझे बताओ बेटा| क्या हुआ है ? अमनदीप कहाँ है? तुम कौन हो?" पण सरानी त्याना काहीही सांगितलं नाही. आता फोन अमनदीपच्या मोठ्या भावाने घेतला. त्याला आम्ही सर्व हकीकत सांगितली. तो देखील डॉक्टरच असावा कदाचित! तो म्हणाला " सर अक्सिडेंट हुआ है तो सी.टी.स्कॅन में क्या दिख रहा है? अभी तक स्कॅन क्यों नही किया? " सर त्याला म्हणाले की "हमारे न्यूरोसर्जनसे बात किजिए! " आणि फोन माझ्याकडे दिला. तो मला वारंवार विचारत होता. "सी. टी. स्कॅन क्यों नही कर रहे हो?" पण अमनदीपला सिटी स्कॅन पर्यंत नेणंही शक्य नव्हतं शेवटी मी म्हणालो "भैया सी.टी. स्कॅन नही कर सकते,अमनदीप आखरी सांसे ले रहा है|"

समोरचा आवाज अचानक शांत झाला. फोनवर पलिकडचा गोंधळ स्पष्ट ऐकू येत होता. त्याचे आईवडील त्याला ओरडत विचारत होते "क्या हुआ? हमें भी बताओ! अमन ठीक है ना? | "आणि मी फोन ठेवला.

काय अवस्था झाली असेल त्या म्हाताऱ्या आई वडिलांची! काय करणार बिचारे? पंजाबमध्ये कुठेतरी कुठल्या गावात रहात असतील कदाचित ! रात्री २ वाजता उठून कसे येणार इकडे? प्रवासात त्यांचा जीव किती कासावीस होईल! आयुष्यातला सर्वात अवघड प्रवास असेल त्यांचा! कधीही न संपणारा!

मी हाच विचार करत तिथेच खाली पायरीवर बसलो. एव्हाना अर्धा पाऊण तास निघून गेला असेल या गडबडीत.

इतक्यात लक्ष्मीकांत बाहेर आला. त्याने मानेनेच खुणावले आणि मी समजलो ह्दय चालू होत नाही. मृत्यू झाला असावा! तो मला म्हणाला, "सर जरा आत येऊन बघा की!" मी आत गेलो. समोरचे दृश्य ह्दय पिळवटून टाकणारं होतं. अमनदीपचा मृत्यू झाला होता! मॉनिटरींग स्क्रीनवरती सरळ लाईन आलेली दिसत होती.पण मुले मात्र थांबत नव्हती. त्याचे १०-१५ मित्र आळी पाळीने CPR देत होते. **(उर्वरित उद्याच्या अंकात)**

# नेटिझन्स - जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

तणाव, चिंता यांसारखे आजार पुर्वी सुध्दा होतेच परंतू ती जीवन पद्धतीच अशी होती की त्या लोकांना "स्ट्रेस मॅनेजमेंट स्किल" आपोआपच अवगत झालेली असायची आणि त्यांना हे माहितही नव्हते की अशी सुध्दा काही स्किल असते परंतु आता जेव्हा हेच पालक त्यांच्या मुलांना मानसोपचार तज्ज्ञांकडे घेवुन जातात तेव्हा त्यांना समजायला लागले की ते सुध्दा स्ट्रेस मॅनेजमेंट करत होते. 2016 दरम्यान जगाने बघितला आणि अनुभवला एक महाभयंकर गेम "ब्ल्यू व्हेल". या गेम ने बऱ्याच लोकांचे स्वप्न, भविष्य आणि म्हातारपणाची लाठीच हिरावून घेतली कारण हा गेम खेळणाऱ्या व्यक्तीला काही विविध चॅलेंज दिले जात असे त्यापैकी एक विचित्र म्हणजे खेळाडूने त्याच्या हातावर धारदार वस्तूने व्हेल मास्याचे चित्र काढणे आणि जसजसे तुम्ही एक एक चॅलेंज पार करणार तसतसे ते अवघड होत जाणार आणि शेवटी एका टप्प्यावर एकतर तुम्हाला कोणाचा तरी जीव घेण्यास



सांगितले जाईल नाहीतर स्वतः चा जीव द्यावा लागेल. त्या नंतर आला "पोकेमॉन गो" यामध्ये "ऑगमेंटेड रिॲलिटी" चा वापर केला होता ज्याद्वारे तुम्हाला हे पोकेमन गोळा करावे लागत असत आणि हे करताना फोन चा कॅमेरा सतत चालू ठेवावा लागे व तुमच्या स्क्रीन मध्ये बघून ते पोकेमॉन जमा करायचे. हे करत असताना खेळणारे इतके व्यस्त झालेले असायचे की ते बऱ्याचदा विहिरीमध्ये, सिंक होल मध्ये, ट्रेन च्या ट्रॅकवर आणि गच्चीवरून पडून जीव गमावावा लागला. ह्या असल्या गेम्स ला सरकार मान्यता देतच कसं? ह्या जीवघेण्या ॲप्स आणि गेम्स वर अटी लावल्या तर उद्या उठून कोणी म्हणू नये की आमच्या पोरांच्या चांगल्या जीवन पद्धतीच्या हक्कावर तलवार ठेवता!

आपल्याला समजायला आणि पचायला हे थोडे कठीण आहे पण अतिरेकांवर निर्बंध लावले म्हणजे स्वातंत्र्याला बंदिस्त करणे असा अर्थ मुळीच होत नाही. काळानुसार जशी उत्क्रांती घडते व आपण बदलतो अगदी त्याचप्रमाणे वेळेनुसार समायोजन करता येणे ही सुध्दा खूप मोठी स्किल असते नसता आपला देखील डायनासोर होईल! भूकंप आल्यावर आपण टेबलाखाली लपतो याचा अर्थ आपण भित्रे असा नव्हे तर त्यालाच तग धरून जिवंत राहणे किंवा जगण्याचे कौशल्य (SURVIVAL SKILL) म्हणतात.



अमोल सोनाजी मोकासे
संपर्क क्र. 9730781775

इंटरनेटच्या वापरावर निश्चितच काही प्रकारचे बंधन असायला पाहिजे याची शाश्वती नुकत्याच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती (सीटीसी) झालेल्या बैठकीत आपले परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दिलेल्या वक्तव्यातून होते ते असे की, 'समाज माध्यमे दहशतवादी गटांना "टूलकिट (सामग्री)" पसरवण्याचे महत्त्वाचे साधन बनले आहे'.

पुढे ते म्हणाले की, "अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये मानवी जीवन उंचावण्याची क्षमता आहे. मात्र त्याच वेळी त्याचा काही समाजकंटकांकडून गैरवापर होण्याची शक्यताही तेवढीच वाढली आहे". आपल्या भारत देशाला येणाऱ्या काळात छाया देण्याचे काम हे जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा यांनाच करायचे आहे त्यामुळे या रोपट्यांना आत्ताच कुंपण घालून त्यांचे व्यवस्थित संगोपन केलेले कधीही परवडणारे आहे. आणि हे कुंपण घातल्यानंतर ज्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा तसेच मूलभूत हक्कांवर निर्बंध अशा नकारात्मकच गोष्टी दिसत असतील तर त्या सर्वांना 1947 अगोदरच्या भारताचा इतिहास वाचण्याची अत्यंत आवश्यकता वाटते.

# लक्षणं बरे दिसना झालेत !



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9834367059




आधुनिक केसरी

**"कुटं बुटं उगवलेलं दिसतं धान आणिक बघावं तिकडं हाराळीचेच बदं झालेत. खुरपणं काढायचं कामंच दिसनाय औत हानून मोडून टाकावी पेर, परत पेरा करावा अशीही दिसनाय परिस्थीती. औत लावून निघायचा नाही हराळीचा गुता थेट नांगरूनच टाकावं लागंल रान आणि येचून काढाव्या लागतील काशा". लेकरांच्या उशीरानं प्रवेश करुनकॉलेजाच्या फीस भरायला आलेले बाप लोक असं भकास डोळ्यांनी काही बाही बोलू लागले वावराबद्दल म्हणजे भलतं अवघड वाटू लागतं.**

दुथडी भरुन वाहणा-या नद्यांनी धरणं भरले, बारकुले तळे फुटले, नद्यायवरले पुलं पडले, तालुक्यातून गावेगावी जाणा-या रस्त्यायची तर पार चाळण झाली. गाड्या आपटून आणि टमटम पलटून पार पाकाडं मोडले. परवा परतीच्या पावसानं रानात साचलेले तळे दाखविले सगळ्या टीव्ही चॅनलवाल्यांनी परत परत, पेपरायमधले पहिल्या पानावरले ओक्याेक्सी रडतानाचे माय-बापाचे फोटो पाहूनही जीवाची कालवाकालव झाली.
मेटाकुटीला आलेले बाप-भाऊ दिवाळीच्या तोंडावर, सगळीकडं घरात दबा धरुन बसलेली माणसं आणि मरणाचीच घाई वाजत राहिली सगळीकडं सरकार बांधावरुन फिरतानाबी दाखवलं पण पदरात पडलं काय तर काहीच नाही.
दुष्काळाचा कहर असो... नाही तर पाण्यानं मोडलेले संसारं असो, सहजासहजी आनंदाचा घास गळ्याखाली उतरु देत नाहीत. 'पटावर पंचेवीस लेकरं नसलेल्या वाड्या वस्त्या तांड्यावरल्या बारकुसन्या शाळा बंद करुनार' म्हणणा-या बातम्यांनी तर जगण्याचं अक्षरशः कंबरडंच मोडलं. एक तर तब्बल दहा वर्षांपासून नौकर भरती नाही. गोरगरीबायला शिकू द्यायचा वान दिसनाय.



कॉलेजायनी तर झालं पद रिकामं की रिकामंच...
भर सिएचबी नाही तर ठिव रिकामं...
हाच एक पवित्रा करुन ठेववाय शहान्यासुरत्या माणसायनी नौक-यांचा. एक तर नौक-यांच्या नावानं ठणठणाट आणि इकडं पदव्यावर पदव्या घेवून लेकरं बेजार करुन टाकलेत घरोघरी
सगळीकडं नॉनग्र्यांटची समांतर शिक्षण यंत्रणा उभी केली आहे कळत कळत नकळत डोळ्यादेक अगदी खेड्यापाड्यतून, नवश्रीमंत आणि व्यापारी माणसिकतेच्या भ्रमिष्ठांनी मेडीकल आणि इंजिनिइरिंगच्या हव्यासापाई रानं लिहून देवून, घरं ब्यांकांकडं घान ठेवून लेकरं इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी टाकलीत एका भावाचे लेकरं मराठी माध्यमात जिल्हा परिषद शाळेत नाही तर खाजगी सेमीत आणि दुस-या नौकरदार भावाचं गाडीत बसून चाललंय इंग्रजी माध्यमात... जावाजावांची, भावाभावांची गावोगावी,घरोघरी धुसपुस आहे. कुठल्या कडंला निघतय जगणं कांही कळायला मार्ग नाही. लक्षणं बरे दिसना झालेत... वरचेवर आवळत चाललाय फास एवढं खरं !

# राष्ट्रीय कर्करोग जागृती दिन



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता दरवर्षी 7 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय कर्करोग जागृती दिन म्हणून संबोधला जातो. कर्करोग माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक. उपाययोजनांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने ह्या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी सर्वप्रथम सप्टेंबर 2014 मध्ये राष्ट्रीय कर्करोग जागृती दिनाची घोषणा केली. केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्ष वर्धन यांनी कर्करोग नियंत्रणासाठी ही राष्ट्रीय चळवळ सुरू केली. याच दिवशी म्हणजे 7 नोव्हेंबर रोजी नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञ मेरी क्युरी यांच्या जयंती असते, ज्यांनी कर्करोगाशी संबंधित कार्यासाठी उल्लेखनीय सेवा बजावली.**

विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी "जागतिक कर्करोग दिन" साजरा केला जातो. इंटरनॅशनल युनियन फॉर कंट्रोल ऑफ कॅन्सर (UICC) ने घेतलेला हा एक जागतिक पुढाकार आहे. इंटरनॅशनल असोसिएशन फॉर कॅन्सर कंट्रोल ही जगातील सर्वात मोठी संस्था आहे जी कर्करोग जागरूकतेची कार्यरत आहे.
देशात कर्करोगावरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय कर्करोग नियंत्रण कार्यक्रम 1975 मध्ये सुरू करण्यात आला.
उपलब्ध माहितीनुसार भारतात, दरवर्षी सुमारे 1.1 दशलक्ष नवीन प्रकरणे नोंदवली जात आहेत, ज्यात सातत्याने वाढ होत आहे.
भारतात सर्वात जास्त गतीने वाढणारा हा आजार आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आपली बदललेली आहार विहार आणि एकंदरीतच बदललेली जीवनशैली! अद्ययावत वैद्यकीय तपासण्या , उपचार पद्धती यामुळे कर्करोग का होतो हे समजले, तरी त्यावर मात करणारी ठोस अशी कायमस्वरूपी उपचारपद्धती आजही हाती लागलेली नाही. उपचारासाठी शेकडो मार्ग उपलब्ध असले तरीही प्रतिबंधात्मक उपाय, आहार व जीवनशैलीतील बदल आणि सजगता हेच पर्याय अवलंबणे हे श्रेयस्कर आहे. 'शरीरात कोणत्याही भागात होणारी पेशींची अनियंत्रित वाढ' अशी या आजाराची व्याख्या करता येईल. पण प्रत्येकाचा कॅन्सर वेगळा आणि त्यामुळे त्या अनुषंगाने त्याचे त्रास वगळे! आजार झाला आहे हे कळल्यापासुन पेशंट मनाने उन्मळून गेलेले असतात. प्रचंड शारीरिक त्रास, दडपण, भीती, उदासी, हे माझ्या बरोबरच का व्हावं - मी कोणाचं काय वाईट केलं आहे हा सततचा विचार, समोर उभ्या ठाकलेल्या उपचाराच्या खर्चाच्या विचारांनीच खचून गेलेले असतात. ही परिस्थिती लक्षात घेऊन जागतिक कर्करोग जागरूकता दिनानिमित्ताने वैद्यकीय संस्था आणि सामाजिक संघटना कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम राबवतात.
या सर्व सामाजिक उपक्रमाद्वारे सकारात्मक जनजागृती तर होतच आहे परंतु वैयक्तिक पातळीवर देखील प्रत्येकाने काही बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे. एक म्हणजे 'मला काय होणार आहे' 'जे होईल ते पाहीलं जाईल' 'काही होत नाही मला' अशा कुठल्याशा विचारधारेवर निर्धास्त राहणेही अयोग्य आणि अति काळजी करत कुढत जगणेही वाईट! तुमचं अंतर्मन तुम्हाला तुमच्या तब्येती विषयी वेळोवेळी जागृत करत असते. कोणी काहीही म्हणो , .. उठुन डॉक्टर कडे जाऊन व्यवस्थित वेळोवेळी चेकअप करावे. गूगल करुन कोणत्याही आजाराविषयी माहीती गोळा करून स्वतःच स्वतःचे



डॉक्टर बनु नये.
तसेच मानसिक आधार द्यायला पैसे, वेळ याची काहीच गरज लागत नाही. तुमच्या संपर्कात कोणी पेशंट असतील तर जसा जमेल तसा त्यांचा आधार बना. हा मुद्दा फक्त कॅन्सर पेशंट साठीच लागु नाही..तर अगदी क्षुल्लक आजारात, प्रसंगी मानसिक ताणतणावात असणाऱ्या जवळच्या व्यक्तींचाही आधार बनायला काहीच हरकत नसावी. आजच्या जगात, लवकर निदान झाल्यास कॅन्सर हा 100% बरा होऊ शकणारा प्रॉब्लेम आहे आणि काही प्रसिद्ध नावामुळे ते सिध्दही झाले आहे. डॉक्टर्सवर विश्वास ठेवून, मनोबल कायम ठेवुन हा प्रवास यशस्वी करणं हाच याचा कानमंत्र आहे असं आपण म्हणु शकतो!
एखाद्या आजाराची आसपास कुणकुण लागली की मग आपल्याला मिळालेलं निरोगी, सुदृढ आयुष्य आपण किती बेदरकारपणे वाया घालवत जगतोय; याची जाणीव क्षणार्धात होते. मग अशा वेळी, असा कॅन्सर सारखा गंभीर आजार मनाने पेलण्यासाठी किती मनोधैर्य आणि किती कणखरपणा लागेल याचा अंदाज येतो. आणि म्हणूनच , खूप महाग आणि मौल्यवान असलेले हे निसर्गदत्त आयुष्य स्वस्तात मिळाल्यासारखे न जगता, आपल्या जगण्यात, जीवन शैलीत शिस्तबद्धता आणून जगभरात सर्वत्र असलेल्या कर्करोग प्रसाराचे प्रमाण वाढू न देता ते कमीत कमी व्हावे यासाठी प्रयत्नशील राहूया.

# भारत जोडो यात्रा- काय संदेश ?



आधुनिक केसरी

**दक्षिणेकडून निघालेली राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा आज महाराष्ट्रात प्रवेश करते आहे. सुमारे दीडशे वर्षांचा इतिहास असलेला काँग्रेस पक्ष गलित गात्र अवस्थेत असताना त्याला पुन्हा ऊर्जा या यात्रेतून मिळू शकेल काय? किंवा काँग्रेसला पुनर्जीवन हाच या यात्रेचा मुख्य हेतू आहे काय?**

विरोधकांच्या लेखी ही काँग्रेसच्या पुनर्जीवनाची यात्रा असू शकते. मात्र देशभरातील काँग्रेसेत्तर पक्ष, त्या त्या राज्यातल्या सामाजिक संघटना ज्या पद्धतीने या यात्रेत सहभागी होत आहे. स्वराज अभियान चे योगेंद्र यादव, मेधा पाटकर, स्टॅलिन, आणि आता महाराष्ट्रात उद्धव ठाकरे,शरद पवार या यात्रेचा हिस्सा बनू पाहत आहे. काँग्रेसच्या कडव्या विरोधकांनाही आता काँग्रेस टिकावी वाचावी असं वाटत आहे. विशेषतः या यात्रेमध्ये स्थानिक तरुण, महिला सामान्य लोक ज्या उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवत आहे. 2014 नंतर च्या देशातील एकसुरी सत्तेला सामान्य लोकांच्या विरोधाचे प्रतिबिंब या भारत जोडो यात्रेमध्ये दिसत आहे. मोदी अमित शहा च्या दडपशाहीच्या राजकारणासमोर अनेक मातब्बर नेत्यांनी गुडघे टेकले असताना सामान्य लोक मात्र उत्स्फूर्तपणे या यात्रेत सहभागी होत आहे. मीडियामध्ये सतत काँग्रेस संपवल्याचे दाखले दिले जात असताना जनतेचा हा सहभाग डोळ्यात अंजन घालणारा आहे.ED , सीबीआय आणि न्यायालयाच्या माध्यमातून देशभरात जे दबावाच राजकारण सुरू आहे, ज्योतिरादित्य सिंधिया, एकनाथ शिंदे गुलाम नबी आझाद.... दिल्ली, तेलंगणा आणि पश्चिम बंगालमधील ईडीच्या धाडी यासारख्या घटनातून देशभरामध्ये एकूण जी द्वेषची पेरणी सुरू आहे. लोक आता त्याला कंटाळे आहेत. याबद्दल लोकांमध्ये प्रचंड



असंतोष आहे. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी याच असंतोषाला आवाज मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहे का? या प्रश्नांचा आढावा आपल्याला खालील काही मुद्द्यांच्या आधारे घेता येईल. 1) भाजपा व्यतिरिक्त देशात कुठलाही सक्षम पक्ष नसताना लोक सहजपणे भाजपाच्या विरोधात रस्त्यावर उतरू शकतात, हे या यात्रेतून प्रकर्षाने जाणवत आहे.

ज्ञानेश्वर वाघचौरे
संपर्क : 9960205456

2) मोदी शहा देशातील सर्व सत्ता केंद्र आपल्या हातात घ्यायचा प्रयत्न करत असताना तुमची ही हुकूमशाही आम्हाला मान्य नाही असा संदेश लोक या यात्रेतून देत आहे. 3) देशात एकीकडे जाती-जातीत ,धर्मा- धर्मात प्रचंड विखारी राजकारण सुरू असताना राहुल गांधी प्रेमाची आणि सद्भावनेची पेरणी देशात करत आहेत, हा संदेश देण्यात ही यात्रा यशस्वी होत आहे.
4) दक्षिण आणि पूर्वोत्तर राज्यात निवडणुकीचा माहोल नसताना लोक राहुल गांधी यांच्यासोबत जोडले जात आहे. पश्चिम आणि उत्तरेच्या राजकारणासाठी हा एक संदेश असू शकतो.
5) राहुल गांधींची बॉडी लँग्वेज विरोधकांना दखल घ्यायला मजबूर करते आहे.
7) प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये तुलनेत कमी कव्हरेज असलं तरी सोशल मीडियाचा मात्र काँग्रेसने कल्पक वापर केला आहे. काँग्रेस खूप दिवसानंतर फ्रंटफुटवर खेळताना दिसते आहे.
काँग्रेसचे अध्यक्ष पद नाकारून लोकशाही पद्धतीने ती जबाबदारी मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे देण, कुठल्याही अभिनिवेशाशिवाय सहजपणे लोकांमध्ये मिसळणं, भाजपाचा विखाराला प्रेमाने उत्तर देणे, आणि या आधारे देशांमध्ये भाजपा विरोधात एक झंजावात निर्माण करण्यात राहुल गांधी यशस्वी होतात काय? हे मात्र येणारा काळच ठरवेल.



# धुळ्यात अनाथ -गरीब, सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा

## हाजी कलीम शाह यांच्या स्मरणार्थ सलग दुसऱ्या वर्षी आमदार फारुख शाह यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आमदार फारुख शाह यांचे बंधू हाजी कलीम शाह ज्यांनी कोरोना काळात गरीब वंचिताना कोरोना आजाराची परवा न करता धुळे शहारातील हजारो गरीब नागरीकांना अन्न, धान्य व प्रवासी मजुरांना जेवणाची व्यवस्था केली होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे गरीब, अनाथ सर्वधर्मीय मुला-मुलींचे सामूहिक विवाह सोहळा सलग दुसऱ्या वर्षी आमदार फारुख शाह यांच्या मार्गदशानाखाली तसेच भिकन हाजी यांच्या देखरेखीखाली संपन्न झाला. पहील्या वर्षी झालेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात एकुण सर्वधर्मीय गरीब, अनाथ मुला-मुलींचे ३० जोडप्यांचे लग्न मोठ्या थाटामाटात संपन्न झाले होते. त्याला अनुसरून आज एकुण २५ जोडप्यांचे विवाह लावण्यात आले. या जोडप्यांना आमदार फारुख शाह यांच्यावतीने संसार उपयोगी पलंग, गादी, कपाट भांडीकुंडी व इतर संसारपयोगी वस्तु देण्यात आले. तसेच या लग्न सोहळ्यात वधू-वरांकडील पाहुण्यांना जेवण देण्यात आले होते. या जोडप्यांमध्ये महाराष्ट्रातील जळगाव, नाशिक, मनमाड,चोपडा, शहादा, शिरपुर, नंदुरबार, यावल तसेच मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर, इंदोर व गुजरात राज्यातील अहमदाबाद, सुरत, नवसारी या जोडप्यांचा समावेश होता. आमदार फारुख शाह यांनी गरीब, अनाथ मुला-मुलींचे परिस्थिती पाहून सामाजिक भावनेने एक पवित्र असे कार्य सुरु ठेवलेले असून यामुळे अनेक अनाथ, गरीब लोकांना या सामुहीक विवाह सोहळ्याचा फायदा होत आहे. या कार्यक्रमाला धुळे शहरातील माजी नगरसेवक सव्वाल अन्सारी, मुजफ्फर अन्सारी, ज्येष्ठ समाजसेवक सलाम मास्टर, फक्रुद्दीन लोहार व सर्व सन्माननीय नगरसेवक यांनी भेट देवून वधु-वराना आशीर्वाद दिले व आमदार फारुख शाह यांच्या कामाची प्रशंसा केली. हा विवाह सोहळा संपन्न करण्यासाठी विवाह सोहळा कमिटीचे अध्यक्ष हाजी भिकन शेठ, हाजी छोटु शाह, जिल्हाध्यक्ष नासीर पठाण, हाजी सलीम शेठ, अनिस शाह, मुख्तार बिल्डर, आमीर पठाण, सउद सरदार, नगरसेवक सईद बेग, गनी डॉलर, हाजी रउफ शाह, गुलाम नबी शाह, हाजी अनिस शाह (मालेगाववाले) अन्सारी हाजी जाहीद, मौलवी शकील, छोटु हाजी मच्छीवाले, पापा सर, कैसर पेंटर, अजहर सय्यद, मजीद पठाण, रफीक पठाण, आसिफ पोपट शाह, आसिफ मुल्ला, हलीम समसुद्दीन, शोएब मुल्ला, मुश्ताक पहेलवान सउद आलम गोलू शाह व अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले.



# ओला दुष्काळ जाहीर करावा अन्यथा रूमने मोर्चा काढणार

## माजी आमदार हर्षवर्धन जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून 63 हजार क्षेत्र बाधित झाले आहे. याचे पुरावे द्यावे, तालुक्यात पंचनामे झाले असेल तर पंचनाम्याचे कागद दाखवा अन्यथा पुन्हा पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा, असे नाही केले तर जिल्हा अधिकारी कार्यालयाचा अपमान केला म्हणून सेवा हमी कायदा अंतर्गत प्रत्येकी शेतकरी पाच हजार रुपये प्रमाणे कारवाई करण्यात येईल. म्हणून लवकरात लवकर कन्नड तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. अन्यथा येत्या 18 तारखेला शेतकऱ्यासह तहसील कार्यालयावर रूमने मोर्चा काढू, असे माजी आमदार हर्षवर्धन जाधव म्हणाले.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे 'ईडब्ल्यूएस' आरक्षणाला घटनात्मक चौकट

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** सर्वसाधारण प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दिलेले दहा टक्के आरक्षण सर्वोच्च न्यायालयात कायम राहिल्याने समाजातील एका मोठ्या आणि गरजू घटकासाठी विकासाची दारे प्रशस्त झाली आहेत. आर्थिक आरक्षणाला घटनात्मक चौकट लाभली आहे अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक, क्रांतिकारी निर्णयाचे स्वागत केले आहे. सामाजिक न्यायाच्या चळवळीला आर्थिक निकषाचा आयाम मिळाला आहे.

सर्वसाधारण वर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या हक्कावर शिक्कामोर्तब करणारा सर्वोच्च न्यायालयाचा हा ऐतिहासिक निर्णय आहे. या निर्णयाचे राजकारण होऊ नये. राजकारणाच्या पलीकडे जाऊन याकडे बघण्याची गरज आहे असेही अजित पवार म्हणाले.

आर्थिक दुर्बलांच्या या विजयी लढ्याप्रमाणे मराठा, ओबीसी, धनगर, मुस्लिम बांधवांच्या हक्काचा लढाही यशस्वी होईल, याची खात्री आहे. त्यासाठी राज्य शासनाने सर्व पक्षांना सोबत घेऊन युध्दपातळीवर प्रयत्न करावेत असे आवाहनही अजित पवार यांनी केले.



# राजू शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये इनकमिंग सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** राजू शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दौलताबाद, माळीवाडा, अब्दीमंडी, वंजारवाडी, शरणापूर, आप्पा वाडी, केसापुरी, रामपुरी येथील सर्व युवकांनी भाजपात प्रवेश केला. या प्रवेशावेळी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीत व तसेच मंत्री अतुल सावे, राजू शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा संपन्न झाला. पप्पू आढाव, अभिजीत भगत, रामा गुंजाळ, राम पेहरकर, बनी शेख, बाबासाहेब मस्के, अध्यक्ष विलास जाधव, संदीप शेळके, गणेश सुरासे, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते व गावकरी, महिला उपस्थित होत्या.




आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# होल्डिंग हँड्स पुणे शाखेची 'मायेची ऊब'

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** ख्रिसमस, इयर एन्ड, न्यू इयर आणि गुलाबी थंडी... एकीकडं थंडीचा आनंद लुटण्यासाठी प्लान आखले जातायत तर दुसरीकडं रस्त्यावर राहणा-यांसाठी मात्र ही थंडी जीवघेणी ठरतेय. असेच काही गारठलेले संसार सावरण्यासाठी मदतीच्या ऊबदार हातांची गरज ओळखून होल्डिंग हँड्स पुणे शाखेने आगरकर नगर, कसबा पेठ, पुणे स्टेशन, कॅम्प येथे रस्त्यावर झोपणाऱ्या गरजवंताला ब्लँकेट देऊन मायेची ऊब दिली.

पुण्यामध्ये कामाच्या निमित्ताने येणाऱ्यांचा लोंढा खूप आहे. घरे नसल्याने काही मजूर रस्त्यावरच गुजराण करीत असतात. असे अनेक गरीब, भिखारी रस्त्यावरच झोपत असतात. सध्या पुण्यामध्ये थंडी भरपूर आहे, यांना गरम ऊब देण्यासाठी होल्डिंग हँड्स पुणे शाखेने ब्लँकेटचे वाटप केले. तसेच घरातले वापरात नसलेले गरम कपडे, जुन्या चादरी किंवा कपडे, त्यांच्यासाठी नक्कीच देऊ शकतो. आज रात्री थंडी एन्जॉय करण्यासाठी घराबाहेर पडाल, तेव्हा सोबत एखादं जुनं ब्लँकेट किंवा चादर घेऊन जा आणि या गरीबांना द्या. निराधारांना थंडीपासून वाचवूया, असं आवाहन यावेळी होल्डिंग हँड्सने इतर लोकांना ही केले. होल्डिंग हँड्स पुणे जिल्हाध्यक्ष अपर्णा मेहता, राज्य विभाग प्रमुख वर्षा जैन यांच्या पुढाकाराने ही मायेची ऊब मिळाली.

# प्राचार्याने केली १० लाखांची चोरी

## गुन्हेशाखेने लावला छडा, आरोपी अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संस्थाचालकाने हडपलेले ३८ लाख रु. परत मिळात नसल्यामुळे प्राचार्याने १० लाख रु ची चोरी केली. गुन्हेशाखेने दोन आठवड्यात हे प्रकरण उघडकीस आणले. चोरीस गेलेल्या रकमे पैकी ५ लाख १८ हजार रु. गुन्हेशाखेने जप्त केले आहेत.तर उरलेले पैशे आरोपीने जंगली रमी या ऑन लाईन गेम मधे उडवले व काही घरी खर्च केल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी सिडको औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. निलेश आरके (३२) असे अटक आरोपीचे नाव आहे आरोपी हा भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते जेके जाधव यांच्या संस्थेत गेल्या दीड वर्षांपासून साई इंजिनिअरिंग महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून काम करत आहे. या संस्थेचा कारभार जे.के. जाधव यांचा मुलगा विक्रांत जाधव पाहतो. २२ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री महाविद्यालयातील तिन्ही महत्वाच्या दालनातील डीव्हीआर तसेच हार्ड डिस्क सह १० लाख रु. चोरल्याची कबुली अटक आरोपी आरके याने पोलिसांना जबाब देताना दिली . या वेळी तपासात उघड झालेल्या माहितीमुळे पोलीस चक्रावून गेले आहेत. अटक आरोपी आरके याने गुन्हेशाखेला माहिती दिली की, दीड वर्षांपूर्वी त्याला एक शैक्षणिक संस्था काढायची होती त्यासाठी त्याने कर्ज काढून ३८ लाख रु जमा केले होते व प्राचार्य म्हणून साई इंजिनिअरिंग महाविद्यालयात नोकरीला लागला त्यावेळी संस्थेचे मालक विक्रांत जाधव यांनी आरके याला विश्वासात घेत त्याच्याशी मैत्री केली. आरके कडे असलेले ३८ लाख रु वापरण्यासाठी घेतले व एका वर्षात १ लाख रु जास्त देतो असे आमिष दाखवले त्यामुळे आरकेने जाधव यांच्यावर विश्वास ठेवून पसे दिले पण एक वर्ष उलटून गेल्यावरही पैसे परत मिळत नसल्यामुळे प्राचार्य असलेल्या आरके ने चोरी केली गुन्हे शाखेने आरकेने दिलेली माहिती विक्रांत जाधव यांच्या लोकविकास बँकेच्या अधिकाऱ्यांकडे पडताळुन पाहिली, असता त्यात तथ्य असल्याचे आढळलेअशी माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली. वरील कारवाई पोलीस आयुक्त डॉ.निखिल गुप्ता, पोलीस उपायुक्त अपर्ना गीते सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल ढुमे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अजित दगडखैर , रमाकांत पटारे, पोलीस कर्मचारी संजय नंद ,संजय तायडे, धनंजय सानप यांनी पार पाडली.

# भारतीय मजदूर संघ घालणार मंत्रालयाला घेराव

## कामगार विरोधी धोरण; शिवजन्म भूमीत केला निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कामगार कायद्यातील एकतर्फी बदल, कामगारांच्या कायम स्वरूपी रोजगारावर आलेली गदा, सरकारचा कामगारांच्या करिता असलेला उदासीन दृष्टीकोन महाराष्ट्रातील असंघीटत कामगारांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा नसणे, विविध ऊद्योगातील वाढत चाललेली कंत्राटी कामगारांची मोठी संख्या, घटत चाललेला कायम स्वरूपी नोकरी अशाच विविध प्रश्नांवर संघटित व असंघीटत कामगारांच्या मागण्याकरिता भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाने दि 21 डिसेंबर 2022 रोजी मंत्रालय मुंबई येथे लाखोंच्या संख्येने येथे भव्य मोर्चा काढुन मंत्रालयाला घेराव घालण्यात येणारे असल्याची घोषणा भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री अनिल ढुमणे यांनी दि 6 नोव्हेंबर 2022 रोजी सांस्कृतिक भवन जुन्नर येथे झालेल्या मजदूर चेतना यात्रेच्या उद्घाटन प्रसंगी केली आहे. शिवनेरी गडावर श्री शिवाई देवीच्या मंदिर पासून चेतना ज्योती सुरवात करण्यात आली. सदरील कार्यक्रमात मोठ्या संख्येने विविध ऊद्योगातील कामगार उपस्थित होते. भामसंघाने 21 डिसेंबर 2022 मंत्रालय मुंबई येथे कामगारांच्या विविध मागण्यांसाठी न्याय हक्कांच्या करिता कामगारांच्या भव्य मोर्चा काढणार असुन या मोर्चामध्ये महाराष्ट्रातील संघटीत व असंघीटत क्षेत्रातील कामगारांच्या प्रलंबित विविध विषयां बाबतीत, कामगारांच्या विविध मागण्या सरकार कडे मांडणार आहे.

**भारतीय मजदूर संघाच्या महत्वपूर्ण मागण्या–**

असंघीटत कामगारां करिता सामाजिक सुरक्षा कोड त्वरित लागु करून सुरक्षा मंडळा मार्फत लाभ देण्यात यावा.

कंत्राटी कामगार पध्दत बंद करून तेथे कार्यरत रिक्त जागांवर कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांची कायम स्वरूपी नियुक्ती करावी, तसेच राजस्थान, आडिसा, हरियाणा, पंजाब राज्याप्रमाणे कंत्राटी कामगारांना कायम नोकरीत समाविष्ट करावे. घरेलु कामगार कल्याण मंडळाचे काम व बांधकाम कल्याण मंडळामार्फत सुविधा, लाभ देण्यात यावेत. अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्स यांच्या मानधनात वाढ करून त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. बिडी ऊद्योगातील कामगारांना किमान वेतना ची प्रभावीपणे अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी. ई पी फ पेंशन दरमहा रू 5000 करण्यात यावी व महागाई भत्ता देण्यात यावा. राज्य सरकारी कर्मचारी करिता जुनी पेंशन योजना लागू करण्यात यावी. पेट्रोल, डिझेल व गॅस यांना जी ऐस टी च्या कक्षेत आणुन महागाईवर नियंत्रण आणावे. संरक्षण उद्योगांचे निगमीकरण मागे घेण्यात यावे. बॅंक व ऐल आय सी चे खाजगी करण मागे घेण्यात यावे. महाराष्ट्रातील प्रलंबित ऊद्योगातील प्रलंबित किमान वेतन वाढ त्वरित घोषित करण्यात यावी. या वेळी व्यासपीठावर भारतीय मजदूर संघाचे केंद्रीय पदाधिकारी चंद्रकांत धुमाळ, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री मा मोहन येणूरे, प्रदेश संघटन मंत्री श्रीपाद कुटासकर, पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास महाराष्ट्रील विविध ऊद्योगातील पदाधिकारी प्रमुख उपस्थित होते, महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघांचे अध्यक्ष निलेश खरात, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, प्रदेश उपमहामंत्री राहूल बोडके, कोषाध्यक्ष सागर पवार, संघटन मंत्री उमेश आणेराव, वीज कामगार महासंघाचे तुकाराम डिंबळे, बिडी कामगारांचे ऊमेश विस्वाद, अभय वर्तक, राज्य सरकारी कामगारांचे पदाधिकारी प्रवीण निगडे, ॲड. संध्या खरे, टेलिफोन ऊद्योगातील वंदना कामठे , बांधकाम कामगार संघटनेचे प्रदेश पदाधिकारी हरी चव्हाण, संजय सुरवसे , बापू दडस, घरेलु कामगार संघटनेचे रामदास शेवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार भामसंघाने पुणे जिल्हा सचिव बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघांचे मंचर विभाग अध्यक्ष राहूल हंडे, विभाग संघटन मंत्री दिपक शिंदे, पुणे झोन सचिव निखिल टेकवडे, लेणाद्री देवस्थानचे संकेत वाणी, विशाल ताम्हाणे व मोठ्या प्रमाणात कंत्राटी कामगारांनी महत्वाचे योगदान दिले आहे.



# पिशोर ठाण्याचे पोलिस निरीक्षकांची बदली करून सय्यद कुटुंबाला न्याय द्या

## महिला आघाडी जिल्हाअध्यक्ष सुमित्रताई खंडारे



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** पोलीस ठाणे, ता. कन्नड, जि. औरंगाबादचे पोलीस निरिक्षक श्रीमती शिंदे यांच्या मनमानी गैरकामकाजाची सखोल चौकशी करुन त्यांची तत्काळ इतरत्र बदली करण्यात यावी, या मागण्या मान्यतेसाठी संघटनेच्या वतीने गुरुवार दिनांक १०/१२/२०२२ पासून पोलिस अधीक्षक कार्यलय औरंगाबाद (ग्रामीण) कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसणे बाबत निवेदन देण्यात आल्याची माहिती दिली आहे,

या बाबत अधिक माहिती मिळाली आहे की संघटनेचे दिनांक २४ / ० ९ / २०२२ व दिनांक ११/१०/२०२२ रोजीचे तक्रार निवेदन देण्यात आले होतो मात्र अद्याप संबंधितावर कठोर कार्यवाही कार्यवाही न केल्याने व संबंधित पोलिस निरीक्षकाची बदली न केल्या मुळे या अनुषंगाने भारतीय दलित कोब्रा या सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात येते की , दिनांक २६/०८/२०२२ रोजी सय्यद आरेफ सय्यद लाल रा . पिशोर ता . कन्नड हे कुटूंबियांसोबत जेवण करत असतांना त्याच गावातील २५ ते ३० गावगुंडांनी सय्यद आरेफ यांच्या घरात घुसून लाठया - काठया - दगड - लोखंडी रॉडने सशस्त्र हल्ला चढविला . सय्यद आरेफ कुटूंबियातील महिला व मुलांना जबर मारहाण केली . याची रितसर तक्रार पिशोर पोलीस ठाणे येथे दाखल आहे . परंतू चौकशी मध्ये पोलीस निरिक्षक श्रीमती शिंदे व त्यांचे सहाय्यक गंडे यांनी हल्लेखोरांसोबत हातमिळवणी करुन पिडीत व निर्दोष सय्यद आरेफ कुटूंबियांवर गुन्हे दाखल केले आणि आरोपींना पाठीशी घालून आरोपींचे पाठराखण केले, उलट तक्रार देणारे श्री सय्यद यांच्यावरच गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून त्यांची बदनामी करून आर्थिक मानसिक त्रास दिल्या आहे, प्रतिष्ठित व्यक्ति व लोकांना न्याय देणाऱ्या वरिष्ठ पत्रकार यांच्यावर असे गुन्हे दाखल होत असल्याने सर्वसामान्य लोकांचे काय?? होणार त्यांना "जिसकी लाठी उसकी भेस" अशी स्थिति पिशोर मध्ये उपस्थिति झाली आहे व पिशोर पोलिस ठाण्याच्या हद्दित वाढती गुन्हेगारी या सर्वबाबी वरिष्ठंच्या निर्देशनात अनन्या साठि व संबंधिताला न्याय मिळावा या करिता उपोषनास सुरवात करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे

**3 महिने उलटुन ही कार्यवाही नाही :** या अन्यायाच्या विरोधात संघटनेने प्रत्यक्ष पिशोर गावात जावून माहिती मिळविली असता संघटनेच्या असे निदर्शनास आले आहे की , पिशोर पोलीस ठाणे हददीमध्ये पो .नि . श्रीमती शिंदे यांच्या आर्शिवादाने अवैध दारु धंदे , मटका , जुगार , गांजा तस्करी चालू आहे . भूमाफिया व खंडणीखोरांनी हैदोस माजविला आहे . पोलीसांचे हप्ते ठरलेले आहे . गावगुंडांवर पोलीस प्रशासनाचा कुठलाही वचक नाही . ज्याचे पोलीसांसोबत लागेबांधे असेल त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही होत नाही . पोलीस ठाण्यामध्ये गुंडांची चलती आहे, पोलिस ठाण्या मध्ये बेकामी, व दलाल यांचा सुळसुळाट वाढ़ला आहे, त्याच्या मध्यमातून आर्थीक व्यवहार करून निर्दोष नागरिकांना कार्यवाहीचा सामना करावा लागत आहे .

# रानडुकराच्या हल्ल्यात तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील जोगलखेडा येथील तरुणाचा



नाचनखेडा शिवारात असलेल्या शेतात रानडुकराच्या हल्ल्यात जागीच मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जितेंद्र गोपीनाथ पाटील वय 42 हा जोगलखेडा शिवारातील महादू लक्ष्मण वनारसे राहणार नाचनखेडा तालुका जामनेर यांच्या शेतात कपाशी वेचण्याचे काम करीत असतांना रानडुकराने त्याच्यावर हल्ला करून हातांना, पायांना, चावा घेऊन गंभीर जखमी केले. अशा अवस्थेत असताना लागलीच 108 ॲम्बुलन्स बोलावून त्याला पहूर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. पहूर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. जोगलखेडा गावात सदर घटनेमुळे दुःखाचे सावट पसरले आहे. मयत जितेंद्र गोपीनाथ पाटील यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, असा परिवार आहे. याबाबत जोगलखेडा तालुका जामनेर येथील पोलीस पाटील विजय त्र्यंबक पाटील यांनी दिलेल्या खबरीवरून पहूर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# १५ दिवसांत रानटी हत्तीचे दोन बळी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** टिपागड डोंगराखाली तलवारगढ येथे शिरून जंगली हत्तीने एका वृद्धाला ठार केल्याची घटना शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. मागील १५ दिवसांत या हत्तींनी दोन जणांचे जीव घेतले तर एक जखमी झाला आहे.

मागील वर्षी ओडिशामधून हे जंगली हत्ती छत्तीसगडमधून गडचिरोली जिल्ह्यात आले. कोरची, कुरखेडा, धानोरा या तीन तालुक्यांत धुमाकूळ घातला होता. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी हे हत्ती छत्तीसगडच्या सीमेत गेले होते. आता परत येऊन महिनाभरापासून गडचिरोली-गोंदिया सीमेलगत धुमाकूळ घालत आहेत. कोरची तालुक्यात तलवारगढ हे गाव येते. जंगल परिसरात हे गाव असल्याने जंगली हत्तींनी गावात प्रवेश केला. धनसिंग धर्मू टेकाम (७१) यांच्या घरात शिरून त्यांना ठार मारले. तर न्याहायकल येथील चम्मीबाई धनसिंग पुडो, सुखदेव कल्लूराम कुरचाम, चैतू सुखदेव कुरचाम या तीन शेतकऱ्यांच्या शेतीचेही नुकसान केले. याविषयीची माहिती मिळताच पूर्व मुरमगाव वनपरिक्षेत्राचे वनकर्मचारी गावात दाखल झाले. त्यांनी नुकसानीचे पंचनामे केले. यापूर्वी लेकुरबोडी येथील ८० वर्षीय वृद्धेला या हत्तींनी सोंडेत उचलून फेकले होते. यातच तिचा जीव गेला होता. तर बेळगाव घाटावर दुचाकीने प्रवास करीत असलेल्या व्यापाऱ्याला जखमी केले होते. मागील आठ दिवसांपासून सदर हत्ती हे कोटगल क्षेत्रातील टिपागढ, तलवारगढ, न्याहायकल जंगल परिसरात फिरत असल्याची माहिती आहे.

# पापनाशिनी तुळस



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**हिंदू धर्मात तुळशीला पापनाशिनी म्हणून अनन्यसाधारण महत्व आहे.भारतातील बहुतेक सर्वच भागात येणारी, उगवणारी वनस्पती आहे.बहुतेक हिंदू कुटुंबियात घरासमोर तुळस असते. तुळशी वृंदावन असते. कार्तिक शुध्द एकादशी पासून ते कार्तिक पौर्णिमा पर्यंत तुळशी विवाह करण्याचा प्रघात आहे. कार्तिक शुध्द एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते. ह्या प्रबोधिनी एकादशीला श्रीविष्णू झोपेतून जागे होतात, आणि चातुर्मास संपतो. सांगता होते. तुळशी विवाह म्हणजे तुळस ह्या पवित्र वनस्पतींचे रोपावर शालिग्राम किंवा विष्णू किंवा त्याचाच अवतार श्रीकृष्ण याच्याशी विवाह करण्याची प्रथा आहे.**

देवांचे जलंदर दैत्याशी युध्द सुरु होते. त्याची वृंदा नावाची पत्नी पतिव्रता होती. तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावामुळेमुळे देवाकडून त्याचा वध होत नव्हता. श्रीविष्णूने जलंधराचे रुप घेऊन, तिच्या पातिव्रत्याचा भंग केला. तिच्या पातिव्रत्यावर प्रसन्न होऊन श्रीविष्णूने तिलावर दिला. "वृंदा, तू तुळस होऊन सगळ्यांना वंदनीय होशील. तुझ्या तुलसीपत्राने भक्त माझी पूजा करतील. तसेच प्रत्येक कार्तिक मासात तुझा विवाह माझ्याशी लावण्यात येईल. भगवान विष्णूला तुळस खूप प्रिय आहे. तिला विष्णूप्रियाही म्हणतात. तुळस ही लक्ष्मीचे रुप मानली जाते. तुलसी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत केल्याने कन्यादानाचे फळ मिळते असेही मानले जाते. हे एक काम्य व्रत आहे. शास्त्रातही सांगितले आहे, ज्यांना कन्या नसेल त्यांनी एकदातरी तुळशीचा विवाह लाऊन कन्यादानाचे पुण्य प्राप्त करुन घ्यावे.

तुलसी विवाह झाल्या नंतर चातुर्मासात जी व्रत, संकल्प केले असतील त्याची समाप्ती करुन ते पदार्थ ब्राम्हणाला दान करून मग सेवन करण्याची पध्दत आहे. तुलसीविवाहानंतरच विवाह मुहूर्त सुरु होतात. हिंदू परंपरेने नुसार तुळशीच्या केवळ दर्शनाने हजारो गायी दान केल्याचे पुण्य लाभते. तिच्या पानावरचे उदक मस्तकावर धारण केलेतर गंगा स्नानाचे पुण्य लाभते. मरतेवेळी अंगावर तुळशीपत्र असेलतर व्यक्ती वैकुंठास जाते. इतके हिंदू धर्मात तुळशीचे महत्व आहे.तुळशीचे पान, एक त्रैलोक्य समान, उठोनिया प्रातःकाली, वंदी तुलसी माऊलीनाही आणिक साधन, एक पूजन तुळशीचे न लगेच तिर्थाटना जाणे,नित्य पूजने तुळसीसी योगायोग न लगे काही,तुळशीवाचून देव नाही. अशा शब्दात संत एकनाथ महाराजांनी तुळशीचे श्रेष्ठत्व सांगितले आहे. देवाला नैवेद्य दाखवताना आपण तुळशीच्या पानांचा वापर करतो. नैवेद्यावर तुळशीपत्र ठेवतो. आपला नैवेद्य देवापर्यंत लवकर पोचावा ही भावना असते.वाईट शक्ती



आपल्यावर आक्रमण करु नाही म्हणूनच दाराशी तुळस लावण्याची प्रथा आहे. दारासमोर वृंदावन असते. जुन्या काही रूढी, परंपरा आहे त्यामागे नक्कीच काहीतरी हेतू होते. आजकाल आपणास बऱ्याच प्रमाणात विसर पडत चाललाय.

तुळशीमध्ये कार्बन आक्साईड शोषून ऑँक्सिजन वायू सोडण्याचा गुणधर्म असल्यामुळे शरिर निरोगी रहाण्यासाठी मदत होते.घरासमोर तुळस असल्यास पिसवा, जंतू शिरकाव करत नाही.तुळस प्रदुषण नाशक आहे. हवा शुध्द करणे हा तिचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. विज्ञान दृष्टीने तुलशी वनस्पती म्हणून खूप महत्वाची आहे.

हिंदूचे अंतःकरणात जसा तुळशिबद्दल पूज्यभाव, पवित्र भाव आहे, तसाच इतरही धर्मातही आदरभाव आहे. इंग्रजी शब्दकोषात तुळशीला पवित्र झाड' म्हटले आहे. ग्रीक भाषेत तुळशीला बेझिलीकाँन म्हणजे राजयोग म्हणतात. तुळशीच्या अंगी विशिष्ट शक्ति आहे असे मानतात. आपल्या हिंदू धर्मात तुळशीचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपण आणि सेवन ह्या गोष्टी युगायुगांची पापे, पातके,नष्ट करतात. म्हणूनच तुळशीला पापनाशिनी म्हणतात. म्हणूनच म्हटले जाते, ज्या घरी तुळशीचे बन आहे, ते घर तीर्थक्षेत्रा  सारखे पवित्र असते.

प्रत्येक हिंदू च्या घरी तुळस असावी असा संकेत आहे. सकाळ-संध्याकाळ तुळशीचे दर्शन घेऊन पावन व्हावे.

# भरले नाही लाईट बिल, शौचालय शो पीस

## आंदोलन करण्याचा पत्रकार दीपक वाघ यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मनपाच्या हद्दीत असलेल्या बाळापुर गावात मोठ्या प्रमाणात समस्यांचा डोंगर उभा असल्याचा पाहवयास मिळत आहे. मनपा सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभालाची जबाबदारी घेणाऱ्या सेवा फाउंडेशनने विद्युत वीज महावितरण कंपनीचे वीज बिल न भरल्याने अखेर महावितरण कर्मचाऱ्यांकडून सार्वजनिक स्वच्छतागृहाची वीज पुरवठा खंडित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे बाळापूर वार्ड क्रमांक 11 मधून मोठ्या मताधिक्याने निवडून आलेले व महापौर पदाच्या खुर्चीवर विराजमान असलेले प्रदीप कर्पे यांच्याच वार्डातील ही गंभीर समस्या असल्याने हा विषय चर्चेचा ठरू लागला आहे. मनपा सार्वजनिक स्वच्छतागृहाची निर्मिती करत लाखो रुपये घेऊन देखभाला ची जबाबदारी घेणाऱ्या सेवा फाउंडेशन कडूनच सोयी सुविधा मिळत नसल्याने नागरिकांनी मनस्ताप व्यक्त केला आहे. धुळे महापालिकेकडून वर्षाला लाखो रुपये कर वसूल केला जातो मात्र आयुक्त, महापौर व संबंधित अधिकारी गावाच्या समस्यांकडे ढुंकूनही पाहत नाही. मग हा कर नेमका कशासाठी वसूल केला जातो असा सवाल पत्रकार दीपक वाघ यांनी व्यक्त केला आहे. गावामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहाची निर्मिती केली मात्र त्या स्वच्छतागृहात कुठल्याही प्रकारचे सोयी सुविधा नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मग हे शौचालय केवळ शोपीस का? असा प्रश्न व्यक्त करण्यात आला आहे. स्वच्छतागृहाची लाईट बिल भरले नाही म्हणून कर्तव्यदक्ष नगरसेवक संजय पाटील यांनी सेवा फाउंडेशनच्या ठेकेदारांचे कान उघडणी केली मात्र आमचेच बिल महापालिकेने थांबवल्याने आम्ही तुमचे लाईट बिल का भरू असे म्हणत आपल्या जबाबदारीतून सेवा फाऊंडेशनचे ठेकेदारांनी अंग काढले..

काही संबंधितांनी ही कागदी घोडे नाचवले. त्यामुळे या सेवा फाऊंडेशनच्या बेजबाबदार कारभारामुळे बाळापूर येथील नागरिक त्रस्त झाले आहे. नागरिकांनी पत्रकार दीपक वाघ यांच्याकडे समस्यांची गऱ्हाणे मांडले आहेत.तसेच लवकरात या समस्यांचे निराकरण न 'झाल्यास मनपा प्रशासन व सेवा फाऊंडेशन विरोधात बाळापूर येथील नागरिकांसह आंदोलन करणार असा इशारा  लोकशाही मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दीपक वाघ यांनी दिला आहे. तसेच खोटे आश्वासन देऊन शासनाचा पैसा वसूल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशाराही पत्रकार दीपक वाघ यांनी दिला आहे.



# माळीवाडा येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील माळीवाडा येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान संपन्न झाले असुन शिबिर माळीवाडा येथे बाजार पेठ या ठिकानी 18 वर्ष वरील महिलांची तपासणी ग्रामीण रुग्णालय कन्नड अंतर्गत वैद्यकिय अधीक्षक डॉ. शरदसिंग परदेशी, वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शन अंतर्गत आरोग्य तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी डॉ.सिकंदर कुरेशी, आरोग्यसेवक नारायण बोहरा, पुरुष अधीपरीचारक चेतन कुमावत, सिस्टर प्रमिला राठोड यांनी महिलांची विविध. बी.पी., शुगर, इत्यादी तपासणी करून औषोध उपचार करून रक्त, लघवी, विविध प्रकारच्या तपासणी करून महिलांचे आरोग्य विषयक समुपदेशन करण्यात आले.

# प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराविरोधात वकील संघाचा लालफिती लावून निषेध




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ज्येष्ठ वकील संघा तर्फे आयुक्ता व कलेक्टर यांच्याविरुद्ध लाल फीत लावून धुळ्यात आज आंदोलन करण्यात आले. ज्येष्ठ वकिलांशी सल्ला मसलत करून महानगरपालिका यांनी नागरिकांना ज्या सुविधा द्यायला हव्यात त्या मिळाल्या नाहीत.  पाणी,रस्ते,स्टेटलाईट,गटार हॅकर झोन बाबतीतही मागील काळापासून दैन्याअवस्था झाली आहे. याच्याविरुद्ध सामाजिक बांधिलकी म्हणून वकिलांनी लढा लढवायचे ठरवले आहे. प्रशासनाचा विरोध करून आयुक्त व कलेक्टर यांना ३० दिवसाचा अल्टीमेट दिला. या संदर्भात मुदत वाढवायची की नाही यासाठी मीटिंग घेण्यात येणार आहे. जो लढा लढायचे ठरले आहे ते कायमस्वरूपी राहील, असे असे आव्हान वकील संघाचे अध्यक्ष यांनी केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# श्री गुरुनानक देव आणि विवेकाधिष्ठित शीख धर्म



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**भारतातील विविध सामाजिक आणि धार्मिक परंपरांपैकी एक धार्मिक आणि वैचारिक विचारधारा म्हणजे शिख धर्म होय. इसवीसनाच्या पंधराव्या शतकात भारतातील पंजाब प्रांतात श्रीगुरु नानक देव यांच्या प्रेरणा आणि वैचारिक परीपेक्षामध्ये शिख धर्माचा उदय झाला. आधुनिक जगाच्या धर्म इतिहासाच्या प्रमुख धर्मामध्ये शिख धर्म हा अत्यंत तरूण आणि झपाट्याने विकसित होणारा धर्म म्हणून ओळखला जातो आहे. शिख धर्म आणि त्याचे अनुयायी संपूर्ण जगभर पसरलेले असून अंदाजे अडीच ते तीन कोटी लोकसंख्या असलेला जगातील पाचव्या क्रमांकाचा हा धर्म आपली तत्वे व्यवस्थितपणे पालन करतांना इतर कोणत्याही धर्माच्या कार्यप्रणालीमध्ये हस्तक्षेप करतांना दिसत नाही.**

शिख धर्माची बैठक ही प्रामुख्याने शिख धर्माचे प्रथम गुरु श्रीगुरु नानक देव यांच्या अध्यात्मिक शिकवण आणि तत्वांवर उभी राहिलेली दिसून येते. श्रीगुरु नानक देव यांच्या नंतर सतराव्या शतकांपर्यंत शिख धर्माच्या नऊ श्रीगुरुंनी शिख धर्माचा प्रचार आणि प्रसार केलेला आढळून येतो. शिख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंघ यांनी शिख धर्माचा पवित्र धर्मग्रंथ श्रीगुरु ग्रंथ साहिब या ग्रंथाची निर्मिती करून हा ग्रंथच शिख धर्माचा अकरावा आणि शेवटचा गुरु मानला जावा असे सांगून यापुढे गुरु परंपरेला पूर्णविराम दिलेला दिसून येतो. पंधराव्या शतकात जन्मलेले श्री गुरु नानक देव हे अत्यंत चिंतनशील प्रवृतीचे होते. वयाच्या अकराव्या वर्षी फारसी भाषा पारंगत करून हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्माच्या संत मंडळी सोबत त्यांचा विचारविनिमय होत असे. अगदी लहान वयातच विवेकवादी विचार करणे आणि अंधश्रद्धावादि मिथ्या विचारापासून गुरु नानक फटकून वागत. नानक हे लोकांमध्ये न मिसळता एकांतवासात वेळ घालवत. वडिलांना आपल्या मुलाच्या एकांतवासाची चिंता लागल्याने त्यांनी ज्योतिष्याला बोलावले, परंतु गुरु नानक हे विवेकवादी विचार करीत असल्याने त्यांनी ज्योतिषाला परत पाठवले. गुरु नानक यांचे वडील त्यांना व्यवसायात उतरण्याचे मार्गदर्शन करीत होते, पण ते एकांतवासात रहायला पसंत करत असल्याने त्यांचे व्यवसायात मन लागले नाही. शेवटी वडिलांनी गुरु नानक यांना विवाह बंधनात बांधले. त्यांना दोन मुले झाली परंतु गुरु नानक यांचे मन संसारात रमले नाही. सकाळी लवकर उठणे नदीवर स्नान करणे आणि तासंतास तिथेच चिंतन करत बसने असा त्यांचा दिनक्रम चाले. एकदिवस ते नदीवर अंघोळीला गेले आणि तीन दिवस कुणाला दिसलेच नाहीत. सर्व लोकांना वाटले कि ते नदीत बुडाले किंवा वाहून गेले. तीन दिवसानंतर जेंव्हा ते बाहेर आले तेंव्हा ते लोकांना भेटल्यावर म्हणाले, 'मी हिंदूही नाही आणि मुसलमानही नाही, मी केवळ एक मनुष्य आहे.' त्या तीन दिवसांत नानकांना काहीतरी आत्मसाक्षात्कार झाला असावा. त्यानंतर मात्र गुरु नानक यांनी अनेक हिंदू तीर्थांचे तीर्थाटन केले. विविध ठिकाणी जाऊन लोकांना धर्म उपदेश दिला. त्यांनी सुप्रसिद्ध बौद्ध आणि जैन तीर्थांना भेटी दिल्या. या विविध यात्रेदरम्यान गुरु नानक यांची अनेक सिद्ध आणि ज्ञानी पुरुषांशी चर्चा झाली. त्यांच्या या सर्व यात्रांना त्यांनी 'उदासिया' असे नाव दिले होते. गुरु नानक देव हे जीवन समजून घेण्यासाठी आणि जनकल्याणार्थ विविध देशाचे भ्रमण केले. वाटेत भेटलेल्या लोकांना उपदेश केला. श्री गुरुनानक देव यांच्या काळात धार्मिक अवडंबर बोकाळले होते. जुनाट रूढीवादी जीवन, अंधश्रद्धा, भ्रष्ट आचार यांनी धर्मक्षेत्र पोखरून निघाले होते. तत्कालीन सर्वच धर्माचे नैतिक अधःपतन झाले होते. सर्वत्र थोतांड आणि कट्टर सांप्रदायिकतेने हाहाकार माजवला होता. धर्मातील सत्यविचार झाकोळले होते. सर्वत्र पाखंडी विचारांनी धर्म डागाळला होता. प्रत्येक धर्मप्रचारक आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देण्यात गुंग होता, परंतु मानवता, सत्य, अहिंसा, प्रेम हि महान मानवी मुल्ये सर्वच विसरून गेले होते. त्याकाळात धर्म हा केवळ काय खावे? काय प्यावे? अंघोळ कशी करावी? गंध कसा लावावा? या भौतिक गोष्टीभोवती अडखळला होता. कट्टरता, मूर्तीपूजा, गंगास्नान, यात्रा आणि अनुष्ठान यांनी सर्वत्र गोंधळ मांडला होता. साधू, संन्यासी, योगी, हटयोगी हे आपणच कसे श्रेष्ठ आहोत हे सांगण्यात गुंतले होते. मंत्र-तंत्र, रिद्धी-सिद्धी, पूजा-अर्चा, शास्त्राचे व्यर्थ खंडन-मंडन यात समाज आणि तत्कालीन धर्म गुरफटला होता.



दुसरीकडे श्रीमंत वर्ग हा नाच-गाणे, व्यभिचार यात मश्गुल होता तर गोर-गरीब लोक उच्च-नीच या जाती बंधनात अडकलेले होते. त्याच काळात शिकंदर लोधीने आणि बाबराने हिंदू मंदिरांची विटंबना आणि तोडफोड सुरु केली होती. अनेक गोर-गरीब लोकांचे बळजबरी धर्मांतर सुरु होते. थोडक्यात सांगायचे म्हणजे मुसलमान शासक सामान्य लोकांवर अन्याय-अत्याचार करत आणि हिंदू शासक आणि धर्म प्रसारक लोकांना कर्मकांड, अवडंबर आणि मिथ्याचार यामध्ये अडकवून ठेवत. त्यांची पिळवणूक करत. हिंदू-मुसलमान या दोन धर्माच्या प्रसारक आणि अनुयायी लोकांमध्ये प्रचंड असूया निर्माण झाली होती. गुरु नानक यांना हे सर्व थोतांड आणि भेदाभेद पटले नाहीत. भोवतालचे हे दृश्य पाहून त्यांचे हृदय पिळवटून जात असे. ते उद्विग्न होत आणि दूर नदीकिनारी एकांतात ध्यानस्थ बसत. शेवटी त्यांनी सत्य आणि विवेक याची कास धरून जीवन आणि धर्माचरण करायचे ठरवले. हिंदूंची बहुदेवोपासना, मूर्तीपूजा, कर्मकांड आणि इस्लाममधील हिंसा हि तत्वे श्रीगुरु नानक देव यांना मान्य झाली नाहीत. त्यांनी माणसांतच ईश्वर पाहिला. अवतार परंपरा, सगुण-निर्गुण भक्ती, जातीभेद, लिंगभेद, जप-तप, योग, अनुष्ठान, पूजा-अर्चा इत्यादी अवडंबर नानकांना मुळीच पटत नसे. याचा परिणाम म्हणजे त्यांनी नवीन धर्म स्थापन करायचे ठरवले. गुरु नानक हे जगभर फिरल्याने, विविध धर्माचे ग्रंथ वाचन केल्याने ते विद्वान, योगाभ्यास पारंगत आणि सर्व धर्मतत्वांचा चिकित्सक आणि तुलनात्मक अभ्यास केलेले विवेकशील पुरुष झाले होते. गुरु नानकांचा सद्सदविवेक पूर्णतः जागृत झाला होता. त्यामुळे त्यांनी 'एक ही ओंकार' हा मूलमंत्र घेऊन 'एकेश्वरवाद' या तत्वावर आधारित शिख धर्म हा नवीन धर्म स्थापन केला. वर्णभेद, जातभेद, लिंगभेद, उच्च-नीच भेद, श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत इत्यादी भेद रहित जीवन आणि आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरं आहोत हा वैश्विक विचार घेऊन त्यांनी शिख धर्म स्थापन केला. गुरु नानक देवांनी शिख म्हणजे शिकवण आणि सुमिरन म्हणजे ईश्वराचे आणि श्री गुरूंच्या उपदेशाचे आत्मिक स्मरन करणे होय असे सामान्य लोकांना पटवून सांगितले. सातत्याने ओंकाराचे नामस्मरण किंवा नामजप करणे हेच शिख धर्माचे मुलतत्व गुरु नानकांनी समाजात रुजविले. गुरु नानक देवांनी शिख धर्म म्हणजे कोणतेही कर्मकांड, पूजा-अर्चा, थोतांड, अवडंबर नसून एक आदर्श जीवन पद्धती आहे असे सांगितले.

हा धर्म म्हणजे कोणतीही उच-निचता नाही, निरंतर नामस्मरण, ईश्वर कीर्तन, एकच ओंकार जप, एकेश्वर वाद, निर्मळ धार्मिक वर्तन, निर्मळ मन, शुद्ध चरित्र आणि चारित्र्य इत्यादी धार्मिक आणि सामाजिक आदर्श शिख धर्माची महत्वपूर्ण सूत्रे आहेत याचे प्रतिपादन केले. तत्कालीन समाजात हि नवतत्व रुजवितांना गुरु नानक देव यांना विविध स्तरावर विरोधही सहन करावा लागला. प्रचलित धर्माच्या धर्ममार्तंडांनी त्यांना कडाडून विरोधही केला.

त्यांच्यावर खूप टीकासुद्धा झाली, परंतु श्रीगुरु नानक हे आपल्या विचारापासून ढळले नाहीत आणि होणाऱ्या विरोधाचे निर्भयतेने खंडन करून शिख धर्माचे तत्व सामान्य लोकांपर्यंत पोहचवले.

श्री गुरूंनी काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे पाच सर्वांत मोठे शत्रू असून यावर नियंत्रण ठेवूनच माणसाला आनंदप्राप्ती, ईश्वरप्राप्ती होऊ शकते असा महत्वपूर्ण उपदेश केला.

हि साधीसोपी तत्वे सामान्य लोकांना पटायला लागली. इतर धर्मामध्ये छळ आणि भेदाभेद होत असतांना सामान्य लोकांना समानतेची शिकवणूक देणारा धर्म म्हणून लवकरच शिख धर्म सामान्य लोकांमध्ये प्रसिद्ध झाला. लोकांना वाळवंटात मरुद्यान दिसावे तसे झाले आणि हजारो लोकांनी धर्मांतर करून शिख धर्म स्वीकारला. अलीकडच्या तीन-चारशे वर्षात शिख धर्माची झपाट्याने वाढ झालेली दिसून येते. यामुळेच भारतात पुढे काही मुघल शासकांनी श्रीगुरू अर्जुन देव आणि श्रीगुरू तेगबहाद्दूर यांचा छळ करून त्यांना मृत्युदंड दिला. हा या धर्मावरील मोठा आघात होता. असा वाढता धार्मिक छळ आणि गुरूंची होणारी कत्तल पाहून सतराव्या शतकाच्या शेवटी शिख धर्माचे दहावे आणि शेवटचे गुरु श्रीगुरु गोविंद सिंघ यांनी शिख धर्मामध्ये विवेक आणि धर्म स्वातंत्र्याचे रक्षण व्हावे या उद्देशाने 'खालसा'ची स्थापना केली. तेंव्हापासून शिख धर्मप्रसारक हे 'संत शिपाई' म्हणून ओळखले जाऊ लागले. परिणामी शिख धर्मप्रसारक किंवा सामान्य शिख स्त्री-पुरुष हे सुद्धा स्वसंरक्षणार्थ शस्त्रधारण करताना दिसतात.

अशाप्रकारे अनेक चढ-उतार, आणि धार्मिक स्थित्यंतरांना सामोरे जात, विविध प्रकारच्या धार्मिक वादळात शिख धर्म हा आधुनिक जगामध्ये धीरोदत्तपणे उभा असून आपली धर्मतत्वे टिकवून आहे. हा धर्म तरुण-तरुणींना आकर्षित करत असून शिख धर्माचे अनुयायी दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहेत. धार्मिक सहिष्णुता, वैचारिक प्रगल्भता, एकेश्वरवाद, समानता, एक ओंकार जप आणि ईश्वर सुमिरन इत्यादी सर्वसमावेशक तत्त्वांनी हा धर्म आजतागायत टिकवून ठेवला आहे. बदलत्या काळात 'लंगर' आणि 'कर सेवा' हि शिख धर्माची विशेष नोंद घेण्यासारखी तत्वे जगाने स्विकारली पाहिजेत. 'भुकेल्यांना अन्न' हे महान तत्व लंगर सारखी कृतीशिल बाब जर सर्वच धर्म आणि धार्मिक स्थळांनी अंगिकारली तर जगात कुणीच ईश्वराचा पुत्र-पुत्री उपाशीपोटी झोपणार नाही. अन्नदानाचे हे महान लोकतत्व जर जगातील सर्वच धर्मांनी अंगिकारले तर शिख धर्माचे संस्थापक श्रीगुरू नानक देव यांनी स्थापन केलेल्या नव्या विचाराच्या शिख धर्माचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही आणि हीच श्रीगुरु नानक देव यांना त्यांच्या जयंतीदिनी आदरांजली असेल.

# माहिती आयोग खंडपीठाचा अजिंठा पोलीस ठाण्याला दंड

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील अजिंठा येथे माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती न देणाऱ्या अजिंठा पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांना राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाचे आयुक्त राहुल पांडे यांनी दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

सविस्तर वृत्त असे की,अजिंठा येथील प्रविण रामधन ढाकरे यांनी,दि.23/06/2019 ते 24/06/2019 या कालावधीतील आपल्या प्रकरणासंबंधी अजिंठा पोलीस ठाण्यास माहिती अधिकाराद्वारे स्टेशन डायरी नोंदीची छायांकित प्रत, सीसीटीव्ही फुटेज,ठाणे अमलदार हजेरी,मतदान केंद्रावर बंदोबस्तासाठी असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती, आदी माहिती मागितली होती.सदर माहिती अजिंठा पोलीस ठाण्याच्या तत्कालीन जनमाहिती अधिकाऱ्यांनी फेटाळल्याने,प्रवीण ढाकरे यांनी सिल्लोड येथील उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.मात्र येथेही उत्तर न मिळाल्याने ढाकरे यांनी राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद येथे द्वितीय अपील दाखल केले.या अपिलावर दि.24/04/2021 रोजी सुनावणी घेऊन, जनमाहिती अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अजिंठा यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम 7 (1) चा भंग झाला असून आपल्यावर 20 च्या तरतुदी नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहून सादर करावा असे आदेश पारित केले.मात्र दोन वेळेस खंडपीठाने अतिरिक्त संधी देऊनही अजिंठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आयोगापुढे हजर झाले नाही.यानंतर स.पो.नि.अजित विसपुते यांनी आयोगास निवेदन करून 7 दिवसांची मुदत वाढ मिळणेसाठी विनंती केली.ही विनंती आयोगाने मान्य करून विसपुते यांना जून 2022 पर्यंत संधी दिली, मात्र तरीही स.पो.नि.विसपुते यांनी आयोगापुढे खुलासा सादर केला नाही.याची राज्य माहिती आयोगाने गंभीर दखल घेत स.पो.नि.अजित विसपुते यांच्यावर आयोगाच्या निर्णय व निर्देशांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असून माहिती अधिकार 2005 या कायद्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन पुरता नकारात्मक असल्याचा ठपका ठेवला.माहिती अधिकारात मागितलेली माहिती नाकारत माहिती अधिकार अधिनियम 7(1) चा भंग झाला असून कलम 20 (1) नुसार संबंधित जनमाहिती अधिकारी शिक्षेस पात्र ठरत आहेत.असा निष्कर्ष आयोगाने नोंदवीत, माहिती अधिकार अधिनियमातील कलम 19(8)(ग) अन्वये अजिंठा पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकास 10 हजार रु दंड ठोठावला आहे.

दंडाची रक्कम वसूल करून ती लेखशीर्षात जमा करण्याची जबाबदारी कलम 19(8) (क) व 19(7) अन्वये आयोगातर्फे पोलीस अधीक्षक ग्रामीण यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.



> पोलिसांकडून माहिती अधिकार कायद्याचा वारंवार भंग होत असल्याने सर्वसामान्यांना न्याय मिळणे दुरापास्त झाले आहे .आम्ही करू तोच कायदा या बेजबाबदार पोलिसांच्या धारणेस राज्य माहिती आयोगाने तडा दिला आहे . **प्रविण ढाकरे, माहिती अधिकार अपिलार्थी**

# नागोबा यात्रा शालिउस्ताद उरुसानिमित्त सावळदबारा येथे आज कुस्त्यांची दंगल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.८/११/२२ मंगळवार रोजी नागोबा यात्रा व शालीउस्ताद उर्सनिम्मितं भव्य कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आली आहे.

मंगळवारी कार्तिकी पौर्णिमानिमित्त काकडा आरती परिक्रमेमध्ये युवक, बालगोपालांचा सहभाग असतो.

प्रातःकाळी महिला घरासमोरील रस्ताची साफसफाई करून रंगीबेरंगी रांगोळ्या टाकून संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमा खुऱ्यावर प्रतिमेचे पूजन करून काकडा आरतीतील भक्तांना गंधटिळा लावून स्वागत करतात. यात्रा सकाळी सातला हरिहरेश्वर विठ्ठल मंदीरापासून काकडा आरतीला सुरुवात होईल. काकडा आरती गावभर फिरून आल्यावर हारेश्वर मंदिर व नागोबा मंदीरावर प्रसाद वाटप करून सांगता करण्यात येईल. अशी माहिती ह.भ.पा. वासुदेव खडके, ह.भ.पा. आबाराव कोलते, भागवत महाजन यांनी बोलताना दिली. याच दिवशी शालीवस्ताद बाबा यांच्या उरुसानिमित जंगी कुस्त्यांची दंगल दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी सात वाजता शालीवस्ताद बाबांचे संदल हे माजी सरपंच मो.लुखमान मो.शरीफ यांच्या घरापासून सुरुवात करण्यात येते यांच्या घरातून शालीउस्ताद बाबांचे संदल ढोलताशांच्या गजरात वाजतगाजत पूर्ण गावात संदल ची मिरवणूक काढण्यात येते. चौका चौकात हिंदू, मुस्लिम यांची मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी असते. मुजावर मो. शब्बीर मो. श्ररवर, शे.अमान शेख बिसमिल्ला यांनी माहिती दिली. तर शालीवस्ताद बाबांचे संदलची मिरवणूक पूर्ण गावाभर फिरून झाल्यावर शालीउस्ताद बाबांच्या दर्गाजवळ या कार्यक्रमाची सांगता करण्यात येते.मिरवणूकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याकरिता फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे उपनिरीक्षक रणजित कासले,बिट जमादार मिरखाँ तडवी,पो.काँ.शिवदास गोपाळ यांच्या कडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



मंगळवारी दुपारी दोन ते सहा वाजेपर्यंत कुस्तीचा कार्यक्रम चालणार आहे. कुस्त्याचे नियम अटी पंचकमेटीचा निर्णय अंतिम राहील.तरी या सोहळाचा कुस्ती पैलवान यांनी आस्वाद घ्यावा व मातीतील कुस्तांचा आनंद घ्यावा असे आवाहन पंचकमेटीचे अध्यक्ष पंजाबराव देशमुख, सचिव मो. लुखमान मो. शरीफ, संचालक डॉ. आर. बी. पांडे, उपाध्यक्ष वसंता चोरमारे, शेख.जलील आयु पठाण, प्राचार्य पंजाबराव कोलते, माजी सभापती चुनीलाल चव्हाण, विठ्ठलराव देशमुख, डॉ. जफर सय्यद, सरपंच भाऊराव कोलते, प्रा. सामाजिक कार्यकर्ते जीवन कोलते, डॉ.विठ्ठल कोते,मधुकर पुजारी, नरेश देशमुख,मनोहर जगताप, मा.सरपंच समाधान सुरडकर, मा.सरपंच मेहताब सांडू,तंटामुक्तीचे अध्यक्ष मुकुदा मानकर पंचकमेटीचे मान्यवर उपस्थित होते.अशी माहीती मो. आरिफ मो. लुखमान,प्रा.जीवन कोलते(सामाजिक कार्यकर्ते)यानी बोलतांना दिली.सदरील भव्य कुस्तीचा कार्यक्रम शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर होणार आहे तरी कुस्ती प्रेमी, पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशे प्रा.जीवन कोलते पाटील यांनी केले आहे.

# मातोश्री शेत पाणंद रस्ते कामात दिरंगाई

## शेतकरी पुत्र गरजला : आ. किशोर अप्पा पाटील यांनी अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** भडगाव मतदार संघात सुमारे ८०० किलोमीटर लांबीच्या शेत रस्त्यांची मागणी असून यातील शंभर किलोमीटर लांबीचे ८१ रस्ते मंजूर झाले आहेत मात्र या रस्ते कामांच्या प्रत्यक्ष कामे सूरु होणाऱ्या विलंबाबद्दल आमदार किशोर अप्पा पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, गटविकास अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजना बद्दल तीव्र नापसंती व्यक्त करत आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना फैलावर घेतले असून मंजूर रस्ते कामांना त्वरित सुरवात करण्याचे व ते त्वरित पूर्ण करण्याचे आदेशीत केले आहे. उपविभागीय अधिकारी डॉ.विक्रम बांदल यांच्या कार्यालयात सोमवारी दुपारी १२ वाजता शेत पाणंद रस्ते कामाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी पाचोरा उपविभागीय अधिकारी डॉ विक्रम बांदल यांची उपस्थिती होती. राज्य शासनाच्या मातोश्री शेत पाणंद रस्ते योजनेतून पाचोरा भडगाव मतदार संघात शेत रस्ते व्हावे यासाठी आ. किशोर अप्पा पाटील यांनी आधीपासूनच आग्रही भूमिका घेतली असून शासनाकडून पहिल्याच टप्यात पावसाळ्यापूर्वीच १०० किलोमीटर लांबीचे ८१ रस्त्यांना मंजूरी आणली होती.यासाठी शासनाने एक किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी २८ ते ३० लक्ष रुपये निधी याप्रमाणे मंजुरी दिली आहे.तसेच दुसऱ्या टप्यात पुन्हा सुमारे २०० किलोमीटर लांबीच्या शेत रस्त्यांना मंजुरी प्रतीक्षेत आहे. मतदार संघातील अनेक शेतकरी बांधवांना शेत रस्त्यांअभावी मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्यामुळे आगामी पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व शेत रस्त्यांची कामे मार्गी लागावे यासाठी आमदार किशोर अप्पा पाटील यांचा प्रयत्न असून अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे वा दिरंगाईमुळे शेतकरी बांधवांच्या शेतरस्त्यांच्या विषयाला उशीर होऊ नये असे आपली भूमिका असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगत कालबद्ध पद्धतीने कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. बैठकीला तहसीलदार कैलास चावडे, पाचोरा गटविकास अधिकारी अतुल पाटील,भडगाव गटविकास अधिकारी वाघ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते श्री थोरात, श्री वाडीले, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी ,बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रावसाहेब पाटील, भडगाव तालुका प्रमुख संजय पाटील, जिल्हा परिषद सदस्य पदमसिंग पाटील, स्वीय सहाय्यक राजेश पाटील, प्रवीण ब्राह्मणे यांची उपस्थिती होती.



शेतरस्ता हा शेतकरी बांधवांसाठी अतिशय जिव्हाळ्याचा विषय असून आगामी २०२४ पर्यंत शेतकऱ्यांनी मागणी केलेले पाचोरा व भडगाव तालुक्यातील सुमारे आठशे किलोमीटर लांबीचे शेतरस्ते आपण पूर्ण करण्याचे उद्धिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे . शेतकरी बांधवानी देखील रस्ते होणे कमी कोणताही अडथळा निर्माण न करता समन्वय व परस्पर सहकार्यातून प्रशासनास सहकार्य करावे जेणेकरून भविष्यात शेतकरी बांधवाला रस्त्याअभावी कोणतीही अडचण येणार नाही .

**किशोर अप्पा पाटील**
**आमदार पाचोरा-भडगाव**



# कृषि विभागामार्फत मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागामार्फत कपाशी पिकांवर लाल्या हा रोग नसून अन्नद्रव्य कमतरते मुळे उद्भवणारी समस्या आहे यावर्षी अतिवृष्टी मुळे जमिनीत टाकलेली खते ही वाहून गेली त्यामुळे कपाशी पिकाला अन्नद्रव्य कमतरता झाल्यामुळे कपासाची पाने लाल झाली आहे यामध्ये प्रामुख्याने लाल्या जमिनीमध्ये असलेल्या मॅग्नेशियम आणि जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे होतो. कपाशीची पाने टोकाकडून व कडेने पिवळसर पडण्यास सुरवात होते. त्यानंतर पानांमधील हरिद्रव्य नष्ट होऊन अँथोसायनिन नावाचे लाल रंगाचे द्रव्य जमा होते. त्यामुळे कपाशीची पाने लाल पडल्यासारखी दिसतात. त्यांचा रंग लाल होतो व शेवटी प्रादुर्भाव झालेली पाने गळून पडतात तसेच कपाशीवरील पाते, फुले ही गळून पडतात. कपाशीला बोंडे भरणे, पाते लागणे यासारख्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत दोन ते तीन वेळेस दोन टक्के युरिया किंवा डीएपीची फवारणी करावी. जर कपाशीवर लाल्या रोगाची लक्षणे दिसू लागल्यास 40 ग्रॅम मॅग्नेशिअम सल्फेट प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून शिफारसीनुसार दोन ते तीन फवारण्या कराव्यात किंवा जमिनीतून 20 ते 30 किलो मॅग्नेशिअम सल्फेट प्रति हेक्टरी द्यावे, असे कृषि सहाय्यक मानसिंग भोळे,सतीश बोरसे यांनी सांगितले.

# गटविकास व ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून घरकुलाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील भूमीहीन व गरजू असलेले विधवा घरकुल लाभार्थी पार्वताबाई बाबूराव चव्हाण यांचे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले असता ते पूर्ण झाले किंवा नाही या कामाची पाहणी करण्यासाठी दि.०३/११/२२ गुरुवार रोजी ग्रामविकास अधिकारी सुधीर भालेराव स्वतः येऊन पाहणी करून त्यांना गृहप्रवेश करून दिला.सोयगाव तालुक्यातील घरकूल लाभार्थींच्या बांधकामांची सोयगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी,इंजिनिअर ईश्वर शिंदे,व ग्रामसेवक सुधीर भालेराव यांनी पाहणी केली. यावेळी सरपंच स्वाती भाऊराव कोलते पाटील,व त्यांचे पती भाऊराव कोलते व उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान,ग्रा.प.सदस्य मोहन सुरडकर ग्रामपंचायत शिपाई अनिल राजपूत, सुभाष मानकर पाणीपुरवठा कर्मचारी,रोजगार सेवक संजय नप्ते,अमोल राऊळकर,आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विधवा घरकुल लाभार्थी पार्वताबाई चव्हाण, गजानन चव्हाण, चंदाबाई चव्हाण यांनी आपल्या हक्काच्या घरकुलात प्रवेश केला. त्यावेळी सर्व लाभार्थ्यांनी सावळदबारा ग्रामपंचायतीचे यावेळी आभार व्यक्त केले.



# डॉ. जगदीश पाटील मराठी विषयात नेट उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**भुसावळ :** येथील संतधामजवळील दूर्गा कॉलनीतील रहिवासी तथा बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश लक्ष्मण पाटील यांनी युजीसीमार्फत घेण्यात आलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) 2022 मराठी विषयात उत्तीर्ण केली आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत असणाऱ्या यूजीसीमार्फत एनटीएतर्फे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक राष्ट्रीय पात्रता परीक्षा म्हणजेच नेट परीक्षा नुकतीच पार पडली. त्यात मराठी विषयाचा निकाल 5.82 टक्के लागला. सदर परीक्षेत संपूर्ण भारतातून मराठी विषयासाठी 3 हजार 829 विद्यार्थ्यांपैकी 223 विद्यार्थी पात्र ठरले. त्यात भुसावळ येथील डॉ. जगदीश पाटील यांचा समावेश आहे. त्यांनी दहा वर्षांपूर्वी श्रीसंत एकनाथांची भक्ती या विषयावर पीएच.डी. पदवी संपादन केली होती. त्यानंतर आता राष्ट्रीय स्तरावरील यूजीसी नेट परीक्षा मराठी विषयात ते उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे देशभरातील विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील मराठी विषयाच्या प्राध्यापक पदासाठी ते पात्र ठरले आहेत.

# शिक्षकाने दिव्यांग मुलाला उन्हात उभे ठेवले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** येथील एका खाजगी शाळेमध्ये मेडिटेशन क्लास दरम्यान पीटी टीचरने एका दिव्यांग मुलाला तासभर उन्हामध्ये उभे ठेवले. विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने आई-वडिलांनी शाळा प्रशासनाला या संदर्भात जाब विचारला. त्यामुळे शाळा प्रशासनाकडून दिव्यांग विद्यार्थी अर्णव राठोडला शाळेतूच निलंबित करण्यात आले. अर्णव राठोड हा नागपुरातील माऊन्ट लिटेरा शाळेत इयत्ता पाचवीत शिकतो. तो 61 टक्के दिव्यांग असून याला जन्मजात सेरेबल पालसी हा आजार आहे. त्यामुळे अर्णवला चालताना नीट तोलही सांभाळता येत नाही. काही वेळानंतर त्याला आसऱ्याची गरज असते. मात्र अशा परिस्थितीतही अर्णव जिद्दीने सामान्य विद्यार्थ्यांसोबत शाळा शिकतो. अर्णवच्या शाळेत बुधवारी पीटीचा (शारीरिक शिक्षण) वर्ग सुरु होता. वर्गानंतर सर्व विद्यार्थी मैदानात बसून मेडिटेशन करत होते. यावेळी अर्णवला जमिनीवर बसवण्यात आले. त्याला खुर्चीची गरज होती.

# जंगलातांडा येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जंगलातांडा सोयगाव तालुका विधी सेवा समिती तथा सोयगाव तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६/११/२२ रविवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय जंगलातांडा येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर घेण्यात आले.जनजागृती नागरिकांचे स्वामीकरण करणेकरीता दि. ३१.१०.२०२२ ते १३.११.२०२२ कालावधी दरम्यान कायदेविषयक शिबीर घेण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने तालुका विधी सेवा समिती तथा सोयगांव वालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वरील कालावधीमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबीर घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय, जंगलावाडा येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये तालुका विधी सेवा समिती अध्यक्षमा न्यायाधीश अमोल भा. इंगोले यांनी विधी सेवा प्राधिकरणाबद्दल नागरीकांना माहिती देऊन नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे फर्दापूर येथील पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिवाणी व फौजदारी कायद्यामधील काय फरक आहे. हे ग्रामस्थांना समजावून सांगितले. त्याचप्रमाणे सोयगाव विधीज्ञ संघाचे जेष्ठ विधीज्ञ अॅड. आर. एस. महाजन यांनी स्त्रियांचे काही अधिकार या बद्दलच्या कायद्याची माहिती दिली. सदर कार्यक्रमात



यावेळी अॅड. राजेश(भैय्या) गिरी, जंगलातांडा येथील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष बाबु चव्हाण, ग्रामसेवक एन. के., गोरे न्यायालयीन कर्मचारी एन.पी. साडे, व यू. जी. काशिदे तसेच गावातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सांडू राठोड यांनी केले.